तिचाहि वरील श्लोकांत उपसंहार केला. व या शेवटच्या श्लोकांत या प्रकरणाचें सतत चिंतन करणाऱ्यास ब्रह्मानंदाची प्राप्ति-निरंतर तृप्ति-हें फल सांगितलें. तात्पर्य, या प्रकरणाचा अभ्यास आत्मसाक्षात्काराच्या उपयोगीं असल्यामुळें तो अवश्य करावा. व आत्मसाक्षात्कार हेंच परमसुखाचें, परमतृप्तीचें व परमपुरुषार्थाचें निमित्त आहे. ॥२९८॥

॥ श्री ॥

८ कूटस्थदीप:

श्रीभारतीतीर्थ मुनींनीं पंचदशीच्या गेल्या सातव्या प्रकरणांत 'अज्ञानादि सात अवस्था चिदाभासाच्या आहेत, कूटस्थाच्या नव्हेत,' असें सांगितलें. पण कूटस्थ कोण, हें अजूनपर्यंत व्हावें तसे स्पष्ट झालेले नाहीं. यास्तव तें स्पष्ट करण्याकरिता कूटस्थ व चिदाभास यांचें विवेचन करितात -

खादित्यदीपिते कुड्ये दर्पणादित्यदीप्तिवत् ।
कूटस्थभासितो देहो धीस्थजीवेन भास्यते ॥१

अन्वयार्थ - [खादित्यदीपिते कुड्ये-] आकाशांतील सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित केलेल्या भिंतीतील [दर्पणादित्यदीप्तिवत् -] आरशांत प्रतिबिंबित होऊन परावृत्त झालेल्या सूर्यकिरणांनीं त्या भिंतीला जसें प्रकाशित करावें त्याप्रमाणें [कूटस्थभासित: देह:-] कूटस्थाकडून सामान्यत: प्रकाशित केला गेलेला देह [धीस्थजीवेन भास्यते-] बुद्धिस्थ चिदाभासाकडून प्रकाशित केला जातो.

प्रकाश:- सूर्यनारायण उदय पावला असतां सर्व सृष्टि प्रकाशित होते, हें सर्वांस ठाऊक आहेच. सूर्याच्या प्रकाशानें आपल्या घरांतील भिंत सामान्यत: प्रकाशित झालेली असते, म्हणजे तिच्यावर प्रकाश सर्वत्र पडलेला असतो. आणि इतक्यांत कोणी सूर्याचें प्रतिबिंब आरशांत घेऊन त्याचा प्रकाश घरांतील भिंतीवर पाडल्यास ती पुन: अधिक प्रकाशित होते, हा दृष्टांत होय. याप्रमाणेंच कूटस्थ या भौतिक देहास प्रथमत: सामान्यरीत्या प्रकाशित करितो. दृष्टांतांतील भिंत, सूर्य, आरसा व

प्रतिबिंब यांच्या स्थानीं दार्ष्टान्तिकांत क्रमानें देह, कूटस्थ, बुद्धि व चिदाभास हे आहेत. भिंतीस प्रकाशित करणारे जसे सूर्याचेच दोन प्रकाश आहेत त्याप्रमाणें देहास सचेतन करणारीं कूटस्थाचींच दोन्ही चैतन्यें आहेत. या श्लोकांत केवल प्रतिज्ञा केली आहे व पुढें सर्व प्रकरणांत प्रतिज्ञात गोष्टीचेंच विस्तारपूर्वक व्याख्यान होणार आहे. ॥१॥

-'अहोपण, आरशांतील सूर्यप्रतिबिंबाच्या दीप्तिवांचून दुसरी दीप्ति भिंतीवर दिसत नाहीं म्हणून म्हणाल तर सांगतों-

अनेकदर्पणादित्यदीप्तीनां बहुसंधिषु ।
इतरा व्यज्यते तासामभावेऽपि प्रकाशते ॥२

अन्वयार्थ - [अनेकदर्पणादित्यदीप्तीनां बहुसंधिषु इतरा व्यज्यते-] **अनेक आरशांत प्रतिबिंबित झालेल्या सूर्याच्या अनेक दीप्तींच्या अनेक संधींमध्यें जशी आकाशस्थ सूर्याची प्रभा स्पष्ट दिसते [तथा तासां अभावे अपि प्रकाशते-] तशीच ती पूर्वोक्त दीप्तींचा अभाव झाल्यावरहि दिसते.**

प्रकाश:- अनेक दर्पणांतून वर्तुलाकार अनेक किरणें घरांतील भिंतीवर थोड्या अंतरानें पाडिलीं असतां, त्यांच्यामध्यें जी संधि असते, त्यांत सूर्याची सामान्य प्रभा दिसतें. तसेंच अशा प्रकारची किरणें मुळींच न पाडल्यासहि ती सूर्याची प्रभा भिंतीवर सारखी पसरलेली असते. हा सर्व प्रकार थोड्याशा विचारानंतर कोणालाहि समजण्यासारखा आहे. ॥२॥

- हा दृष्टान्तसिद्ध अर्थ दार्ष्टांतिकाच्या ठिकाणीं योजून दाखवितात -

चिदाभासविशिष्टानां तथाऽनेकधियामसौ ।
संधिं धियामभावं च भासयन् प्रविविच्यताम् ॥३

अन्वयार्थ - [तथा चिदाभासविशिष्टानां अनेकधियां संधिं-] त्याचप्रमाणें चिदाभासयुक्त अनेक बुद्धिवृत्तींची संधि [च धियां अभावं-] व त्यांचा अभाव यांस [भासयन् असौ प्रविविच्यताम्-] प्रकाशित करणारा हा कूटस्थ त्यांहून भिन्न आहे, असें जाणावें.

प्रकाश:- एक वृत्तिज्ञान होऊन त्याचा लय होणें व दुसऱ्याची उत्पत्ति होणें यांच्यामध्यें जो कांहीं थोडासा काल जातो तो कूटस्थरूप होय. व तो जर नसता तर एक वृत्तिज्ञान नष्ट झालें व दुसरें उत्पन्न झालें,हें कधींच समजलें नसतें. अर्थात् दृष्टांतर्गत संधींतील प्रकाशाप्रमाणें हा कूटस्थ आहे. जी भिंत सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित झालेली नसते, तिच्यावर जरी वर्तुलाकार किरणें पाडिलीं, तरी त्यांच्यामधली संधीचें ज्ञान होत नाहीं. हें सर्वांस ठाऊक आहे. ॥३॥

-आता देहांत कूटस्थ व चिदाभास यांचा भेद प्रदर्शित करण्यासाठीं देहाच्या बाहेरहि चिदाभास व ब्रह्म यांचा विभाग करून दाखवितात-

घटैकाकारधीस्था चिद्घटमेवावभासयेत् ।
घटस्य ज्ञातता ब्रह्मचैतन्येनावभासते ॥४

अन्वयार्थ - [घटैकाकारधीस्था चित् घटं एव अवभासयेत् -] **केवल घटाकार झालेल्या बुद्धीमध्यें राहणारा चिदाभास एका घटालाच प्रकाशित करितो. [घटस्य ज्ञातता तु ब्रह्मचैतन्येन अवभासते -] पण घटाची ज्ञातता ब्रह्मचैतन्याच्या योगानें भासते.**

प्रकाश- इंद्रियद्वारा वृत्तिरूपानें बाहेर पडून बुद्धि विषयरूप होते. व त्या बुद्धीमध्यें जो चिदाभास असतो, तो घटास व्यक्त करितो, त्यावांचून त्याला कांहींएक करितां येत नाहीं. पण 'मला घट समजला' असें जें वाटत असतें, तें कोणाला ? या प्रश्नाचें उत्तर प्रस्तुत श्लोकाच्या उत्तरार्धात आहे. म्हणजे 'घट समजला' असें जें वाटतें तें ब्रह्मचैतन्यामुळेंच होय, तात्पर्य 'हा घट' असें जें ज्ञान होतें, तें चिदाभासामुळें व मला 'घटाचें ज्ञान झालें,' 'मी घटास जाणलें' असें जें ज्ञान होतें, तें घटाच्या कल्पनेचं अधिष्ठान जें ब्रह्म त्याच्यामुळें होय. अर्थात् त्यांचा हा विभाग स्पष्ट आहे. ॥४॥

-'अहोपण, ज्ञाततेला प्रकाशित करणाऱ्या चैतन्यानेंच घटप्रतीति संभवत असतांना बुद्धीची काय आवश्यकता आहे ?' उत्तर -

अज्ञातत्वेन ज्ञातोऽयं घटो बुद्ध्युदयात्पुरा ।
ब्रह्मणैवोपरिष्टात्तु ज्ञातत्वेनेत्यसौ भिदा ।।५

अन्वयार्थ - [बुद्ध्युदयात् पुरा अयं घट: अज्ञातत्वेन ज्ञात:-] बुद्धीचा उदय होण्यापूर्वी हा घट अज्ञातपणें ज्ञात होता, [उपरिष्टात् तु ब्रह्मणा एव ज्ञातत्वेन ज्ञात:-] पण नंतर ब्रह्माच्या योगानेंच हा ज्ञातपणें ज्ञात झाला, [इति असौ भिदा-] असा यांमध्यें भेद आहे.

प्रकाश:- कोणत्याहि पदार्थाचें भान होण्यापूर्वी तो पदार्थ अज्ञात असतो. व बुद्धिवृत्ति पदार्थाकार झाल्यावांचून त्याचें भान होत नाही. पण बुद्धिवृत्तीचा उदय होऊन ती पदार्थमय होईतों पदार्थाचें ज्ञान नसतें. यालाच पदार्थाचें अज्ञान म्हणतात. व त्यालाहि नित्य ब्रह्माचा आधार असतोच. कारण त्याच्या आधारावांचून मला अमुक पदार्थ दिसला नाहीं, असं समजणे अशक्य आहे. यास्तव वृत्तीच्या उदयापूर्वी कोणताहि पदार्थ जसा अज्ञातपणें समजत असतो, तसाच तो वृत्त्युदयानंतर 'मला हा समजला.' अशा प्रकारें ज्ञातपणें समजतो. सारांश, ज्ञातता, अज्ञातता हे दोन्ही धर्म ब्रह्मरूप अधिष्ठानावर राहतात. ।।५।।

-'पण एकाच घटाचें ज्ञातत्व व अज्ञातत्व असें द्वैविध्य कसें संभवतें ?' उत्तर -

चिदाभासांतधीवृत्तिर्ज्ञानं लोहांतकुंतवत् ।
जाड्यमज्ञानमेताभ्यां व्याप्त: कुंभो द्विधोच्यते ।।६

अन्वयार्थ - [लोहांतकुंतवत् चिदाभासांतधीवृत्ति: ज्ञानं-] लोखंडाच्या भाल्याच्या अग्राप्रमाणें चिदाभास जिच्या अग्रभागीं आहे अशी बुद्धिवृत्ति हेंच ज्ञान [च जाड्यं अज्ञानं-] व जाड्य-स्वत: स्फूर्तिराहित्य हेंच अज्ञान होय. [एताभ्यां व्याप्त: कुंभ: द्विधा उच्यते-] त्यांनीं संबद्ध झालेला घट दोन प्रकारचा आहे, असें म्हटलें जातें.

प्रकाश:- बुद्धीमध्यें प्रतिबिंबित जें चैतन्य तोच चिदाभास होय. व तो आहे जिच्या अग्रभागीं आहे अशा बुद्धीच्या वृत्तीस 'ज्ञान' असें म्हणतात. या ज्ञानास भाल्याचा दृष्टांत दिला आहे. म्हणजे ज्ञानामध्यें भाल्याच्या तीक्ष्ण टोंकाप्रमाणें हा चिदाभास पुढें असतो व भाल्याच्या मागील काठीप्रमाणें बुद्धि असते. तसेंच ज्ञानाच्या विरोधी, अनादि, भावरूप व अनिर्वचनीय असें जें कांहीं आहे व जें सदा बुद्धीमध्येंहि राहतें तें अज्ञान होय. अर्थात् अशा प्रकारचें ज्ञान व अज्ञान यांच्या योगानें व्यापून राहणारा कोणताहि पदार्थ दोन प्रकारचा आहे असें म्हणतात. ।।६।।

-'अहो, अज्ञात घट अज्ञानानें व्याप्त झाल्यामुळे तो ब्रह्माकडून प्रकाशित होवो, पण ज्ञानानें व्याप्त झालेल्या ज्ञात घटाला ब्रह्मचैतन्यावभास्यत्व कसें ?' उत्तर -

अज्ञातो ब्रह्मणा भास्यो ज्ञात: कुंभस्तथा न किम् ।
ज्ञातत्वजननेनैव चिदाभासपरिक्षय: ।।७

अन्वयार्थ - [अज्ञात: घट: यथा ब्रह्मणा भास्य:-] अज्ञात घट जसा ब्रह्माकडून प्रकाशित होण्यास योग्य आहे [तथा ज्ञात: कुंभ: न किं-] तसाच ज्ञात घट नाहीं का ? [यत: ज्ञातत्वजननेन एव चिदाभासपरिक्षय: भवति-] कारण त्याचें ज्ञातत्व उत्पन्न केल्यानेंच चिदाभासाचा सर्व प्रकारें क्षय होतो.

प्रकाश:- 'घट समजलेला नाहीं.' हें जसें ब्रह्मास भासतें तसेंच 'तो समजला' हें कां भासणार नाहीं ? 'अज्ञातसमयीं चिदाभासाचें कामच नसल्यामुळें त्या अवस्थेचें प्रकाशन ब्रह्म करितें पण ज्ञातसमयीं चिदाभासाची अवश्य आवश्यकता असल्यामुळें त्याच्याच योगानें पदार्थांच्या ज्ञातावस्थेचें ज्ञान होणें शक्य आहे' असें जर म्हणशील तर ते बरोबर नाहीं.

कारण ज्ञाततेस उत्पन्न केल्यानेंच चिदाभासाचें सामर्थ्य नष्ट होत असतें. अथवा पदार्थाविषयींचें ज्ञान उत्पन्न करणें एवढेंच कायतें त्याचें काम असतें व त्यामुळें त्या ज्ञाततेचा प्रकाशक दुसराच कोणी असणें युक्त आहे. व तो म्हणजे हें ब्रह्मच होय. ॥७॥

-'अहोपण, अज्ञातत्व उत्पन्न करण्यास जसें अज्ञान पुरे आहे त्याचप्रमाणें ज्ञातता उत्पन्न करण्यास एकटी बुद्धिच पुरे. निराळा चिदाभास कशाला हवा ?' उत्तर -

आभासहीनया बुद्ध्या ज्ञातत्वं नैव जन्यते ।
तादृग्बुद्धेर्विशेषः कः मृदादेः स्याद्विकारिणः ॥८

अन्वयार्थ - [आभासहीनया बुद्ध्या ज्ञातत्वं न एव जन्यते-] चिदाभासहीन बुद्धीकडून ज्ञातत्व उत्पन्न केलें जात नाहीं. [तादृग्बुद्धेः मृदादेः विकारिणः कः विशेषः स्यात्-] कारण तसल्या बुद्धीचा मृत्तिका इत्यादि विकारी पदार्थाहून विशेष तो कोणता ?

प्रकाशः- केवल बुद्धि अनात्म वर्गामध्यें येत असल्यामुळें ती पाषाणाप्रमाणें जड आहे व त्यामुळें तिला कोणत्याहि पदार्थाची ज्ञातता उत्पन्न करितां येत नाही. म्हणजे केवल बुद्धीस ज्ञान होणें अशक्य आहे. यास्तव तिला चिदाभासाचें साह्य घेतल्यावांचून कोणत्याहि पदार्थाचें ज्ञान होत नाहीं. **तादृक् बुद्धेः-** चिदाभासरहित बुद्धि व मृत्तिका इत्यादी पदार्थ यांमध्यें भेद तो कोणता ? अर्थात् तीं दोन्ही सारखींच होत. ॥८॥

चिदाभासरहित बुद्धीनें पदार्थास जरी व्यापलें तरी ज्ञातत्व उत्पन्न होत नाहीं, असें आतां दृष्टान्तपूर्वक सांगतात-

ज्ञात इत्युच्यते कुंभो मृदा लिप्तो न कुत्रचित् ।
धीमात्रव्याप्तकुंभस्य ज्ञातत्वं नेष्यते तथा ॥९

अन्वयार्थ - [यथा मृदा लिप्तः कुंभः ज्ञातः इति कुत्रचित् न उच्यते -] ज्याप्रमाणें मातीनें लिंपलेला घट 'जाणला' असें कोठेंहि कोणी म्हणत नाहीं, [तथा धीमात्रव्याप्तकुंभस्य ज्ञातत्वं नेष्यते-] त्याप्रमाणें केवल बुद्धीकडून व्याप्त झालेल्या घटाला ज्ञातत्व आहे, असें मानलें जात नाहीं.

प्रकाशः- माती व बुद्धि हीं दोन्हीं सारखींच असें दाखविलें आहे. ॥९॥

-तात्पर्य -

ज्ञातत्वं नाम कुंभेऽतश्चिदाभासफलोदयः ।
न फलं ब्रह्मचैतन्यं मानात्प्रागपि सत्त्वतः ॥१०

अन्वयार्थ - [अतः-] केवल बुद्धीमध्यें ज्ञातत्व उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें [कुंभे चिदाभासफलोदयः ज्ञातत्वं नाम-] कुंभाच्या ठिकाणीं चिदाभासरूप फलाची उत्पत्ति होणें हेंच ज्ञातत्व म्हणून प्रसिद्ध आहे [ब्रह्मचैतन्यं फलं न भवति-] ब्रह्मचैतन्य हें फल म्हणजे घटादिकांचें स्फुरण नव्हे. कारण [मानात् प्राग् अपि सत्त्वतः-] प्रमाणाची प्रवृत्ति होण्यापूर्वींहि ब्रह्मचैतन्य विद्यमान असतें.

प्रकाशः- केवळ बुद्धि जड असल्यामुळें तिच्यामध्यें ज्ञातत्व या धर्मास उत्पन्न करण्याची शक्ति नसते; असें पूर्वीं सांगितलेंच आहे. यास्तव ज्ञातव्य म्हणजे काय तें आतां सांगतात. चिदाभास हेंच प्रमाणाचें फल होय. व त्याचा उदय होणें म्हणजेच घटादि पदार्थांच्या ठिकाणची ज्ञातता (जाणणेंपणा) उत्पन्न होणें होय. **वादीः-** अहो, पण सर्व स्फूर्तीचें अधिष्ठान जें ब्रह्म, तेंच प्रमाणफल होय असें म्हटल्यास काय बिघडेल ? **सिद्धान्तीः-** ब्रह्मचैतन्य तर प्रमाणाच्या उत्पत्ति पूर्वींहि असतें तेव्हां त्यास 'फल' कसें म्हणता येईल ? प्रमाणाच्या प्रवृत्तीनंतर फल उत्पन्न होत असतें असा नियम आहे. यास्तव ब्रह्मचैतन्य फल नव्हे. ॥१०॥

-'पण हें तुमचें म्हणणें सुरेश्वराचार्यांच्या

वार्तिकाविरुद्ध आहे' अशी आशंका घेऊन तिचा परिहार करितात -

परागर्थप्रमेयेषु या फलत्वेन संमता ।
संवित्सैवेह मेयोऽर्थो वेदान्तोक्तिप्रमाणतः ।।११

अन्वयार्थ - [परागर्थप्रमेयेषु फलत्वेन संमता या संविद् -] बाह्य पदार्थ प्रमाणाचा विषय झाले असतां फलत्वानें संमत असलेली जी संविद् [सा एव इह वेदान्तोक्तिप्रमाणतः मेयः अर्थः अस्ति-] तीच या वेदान्तशास्त्रांत वेदान्तवाक्यरूपप्रमाणानें ज्ञातव्यविषय आहे.

प्रकाशः- परागर्थप्रमेयेषुः- प्रमाणांना विषय होणारे पदार्थ पराक् (बाह्य) होत. अर्थात् बुद्धि घटादि जेवढे म्हणून जड पदार्थ आहेत, तेवढे सर्व परागर्थ आहेत. प्रमेय म्हणजे प्रमाणांचा विषय, यास्तव या सर्व पदांचा प्रत्यगर्थरूप प्रमाण विषयांमध्यें म्हणजे त्या त्या पदार्थाच्या योगानें मर्यादित झालेल्या चैतन्यामध्यें असा अर्थ होतो. अशा प्रकारच्या चैतन्यामध्यें जी संवित् (चिति) फलरूपत्वानें (प्रमाणफल चैतन्यत्वानें) सर्व विद्वानांस मान्य आहे, तीच या अद्वैतशास्त्रामध्यें 'प्रमितीचा विषय' होय. हा श्लोक पारिभाषिक असल्यामुळें अति कठिण आहे. यास्तव प्रमेयादिकांविषयीं येथें थोडीशी अधिक माहिती देणें अवश्य आहे.

शरीरामध्यें राहणारा, सर्व शरीरास व्यापून टाकणारा व सूक्ष्मपंचभूतापासून होणारा, असा जो अविद्येचा विवर्तनामक परिणाम त्यासच अंतःकरण असें म्हणतात. तो आरशाप्रमाणें अति स्वच्छ असतो. नेत्रादि इंद्रियांच्या द्वारा बाहेर पडून व घटादि योग्य पदार्थास व्यापून तो त्या त्या पदार्थाच्या आकाराचा होतो. सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें त्याचा एकदम संकोच व विकास होत असतो. हा अविद्येचा विवर्तसंज्ञक परिणाम सावयव असल्यामुळें देहांत, पदार्थाचे ठायीं, व देह आणि विषय यांच्या मध्येंहि राहतो. त्यांतील देहामध्यें राहणाऱ्या अहंकारसंज्ञक अंतःकरणाच्या भागास 'कर्ता' म्हणतात. देह व विषय यांच्या मध्यें राहणाऱ्या भागास 'वृत्तिज्ञान' किंवा 'क्रिया' म्हणतात. आणि जो भाग विषयास व्यापून राहतो त्यास 'अभिव्यक्तियोग्यता' म्हणतात. हिच्या योगानेंच विषयज्ञानाचें कर्म होतें. अभिव्यक्ति होते व तें स्वच्छ अंतःकरणांत प्रगट झालेलें चैतन्य जरीं वस्तुतः एकच असतें तरी त्यास प्रगट करणारें अंतःकरण त्रिविध असल्यामुळें तेंहि तीन प्रकारचे होतें. आणि कर्तृसंज्ञक अंतःकरणयुक्त चैतन्य प्रमाता क्रियासंज्ञक अंतःकरणयुक्त चैतन्य प्रमाण व विषयगत अभिव्यक्तियोग्यतासंज्ञक अंतःकरणयुक्त चैतन्य प्रमिति होय. विषयगत ब्रह्मचैतन्यास प्रमेय म्हणतात, तेंच अज्ञान होय. ज्ञान झालें असतां तेंच फल होतें. सारांश, ब्रह्मचैतन्यच अधिष्ठान असल्यामुळें तेंच ज्ञानत्व या उपाधीनें युक्त झालें असतां फल होतें हें निर्विवाद आहे. आणि ''गाय आण'' एवढीच ज्याला गुरूनें आज्ञा केली आहे अशा एकाद्या शिष्यानें पांढऱ्या रंगाची गाय आणल्यास 'तूं पांढरी गाय कां आणलीस' असें म्हणून गुरू त्याच्यावर रागावत नाहीं, असा अनुभवहि आहे. तस्मात् विशिष्ट पदार्थ शुद्ध पदार्थाहून भिन्न नसतो असें ठरतें व त्यामुळे वाणी व मन यांस गोचर न होणाऱ्या ब्रह्माच्या ठायीं, जिज्ञासूच्या बुद्धीचा प्रवेश होत नसल्यामुळें त्याच्यावर अनुग्रह करण्याकरितां हें वार्तिक प्रवृत्त झालें आहे. पण हा खरा प्रकार संप्रदायशून्य असलेल्या वाद्यास समजला नाहीं. व त्यामुळें त्यानें प्रस्तुत वार्तिकांत 'ब्रह्मचैतन्यच फल होय.' असें म्हटलें आहे-असें समजून त्याच्याशीं पूर्व श्लोकाचा विरोध आहे असें या श्लोकांत सांगितलें. ।।११।।

- या वार्तिकाचें तात्पर्य काय, तें आतां सांगतात -

इति वार्तिकारेण चित्सादृश्यं विवक्षितम् ।
ब्रह्मचित्फलयोर्भेदः साहस्र्यां विश्रुतो यतः।।१२

अन्वयार्थ - [इति वार्तिककारेण चित्सादृश्यं

विवक्षितम्-] या वार्तिकानें वार्तिककारांना केवल चैतन्याचें सादृश्य विवक्षित आहे. [यत: साहस्यां ब्रह्मचित्फलयो: भेद: विश्रुत: अस्ति-] कारण उपदेशसाहस्रीमध्यें ब्रह्मचैतन्य व फल यांचा भेद स्पष्टपणें सांगितलेला आहे.

प्रकाश:- प्रस्तुत वार्तिकांत चैतन्याचें सादृश्य असतें, एवढेंच सुरेश्वराचार्यांस सांगावयाचें आहे असें म्हणावें लागतें. कारण, श्रीमच्छंकराचार्यांनीं उपदेशसाहस्रीच्या चवदाव्या प्रकरणांत ब्रह्मचैतन्य व फल चैतन्य यांचा भेद स्पष्टपणें सांगितला आहे. त्यामुळें सुरेश्वराचार्याचें वार्तिक भाष्यकाराच्या मताविरुद्ध आहे. त्यामुळें असें मानण्यापेक्षां त्याची पूर्वोक्त प्रकारें व्यवस्था लावणें सयुक्तिक होय. ॥१२॥

-आणि-

आभास उदितस्तस्माज्ज्ञातत्वं जनयेद्घटे ।
तत्पुनर्ब्रह्मणाभास्यमज्ञातत्ववदेव हि ॥१३

अन्वयार्थ - [तस्मात् उदित: आभास: घटे ज्ञातत्वं जनयेत्-] ज्याअर्थी ब्रह्मचैतन्य व फल यांचा भेद आहे त्याअर्थी उत्पन्न झालेला आभास घटाच्या ठिकाणीं ज्ञातता उत्पन्न करितो [तत्पुन: अज्ञातत्ववत् एव हि ब्रह्मणा आभास्यम्-] व ती ज्ञातता अज्ञाततेप्रमाणेंच ब्रह्माकडून प्रकाशित होण्यास योग्य आहे.

प्रकाश:- सूर्यप्रकाशाचें साह्य घेऊन प्रवृत्त झालेल्या नेत्रांच्या द्वारा पदार्थांशीं संयुक्त होऊन घटाकार झालेली बुद्धिवृत्ति पदार्थाविषयींची ज्ञातता उत्पन्न करील व ब्रह्म पूर्वी जसें त्याच्या अज्ञाततेस प्रकाशित करीत होतें, त्याप्रमाणेंच नंतर त्यांच्या ज्ञाततेसहि प्रकाशित करील. कारण जें जें पुढें येईल तें तें दीपाप्रमाणें प्रकाशित करणें एवढेंच ब्रह्मचैतन्याचें काम आहे. ॥१३॥

ह्याप्रमाणें ब्रह्म व चिदाभास यांच्यामधील भेद दाखवून आतां त्यांचे विषय भिन्न असल्यामुळेंहि ते भिन्न आहेत हें स्पष्ट करितात-

धीवृत्त्याभासकुंभानां समूहो भास्यते चिता ।
कुंभमात्रफलत्वात्स एक आभासत: स्फुरेत् ॥१४

अन्वयार्थ - [चिता धीवृत्त्यभासकुंभानां समूह: भास्यते-] ब्रह्मचैतन्याकडून बुद्धिवृत्ति, आभास व घट यांचा समुदाय प्रकाशित केला जातो, [कुंभमात्रफलत्वात् आभासत: स: एक: एव स्फुरेत्-] पण चिदाभासाला केवल कुंभनिष्ठफलता असल्यामुळें त्याच्या योगानें एका घटाचेंच स्फुरण-ज्ञान होतें.

प्रकाश:- प्रमाणजन्य; मनोवृत्ति, प्रमाणफलसंज्ञक त्यांतील चिदाभास व विषयभूत कोणताहि पदार्थ यांच्या समूहास-पदार्थांचे अधिष्ठानभूत चैतन्य प्रकाशित करितें-असा अबाधित अनुभव आहे. व त्यामुळेंहि ब्रह्म व चिदाभास यांचा भेद व्यक्त होतो. आतां ब्रह्मचैतन्याची काय जरूर आहे. एकटा चिदाभासच विषयांस व्यक्त करितो, असें म्हटल्यास कोणती हानि आहे ? असें जर विचारशील तर सांगतों- चिदाभास केवल त्या त्या पदार्थांवर राहणारा (फलरूप) असल्यामुळें त्याच्या योगानें केवल तो तो पदार्थ मात्र भासेल. पूर्वोक्त अनुभवानें वृत्यादिकांचा समुदाय भासणार नाहीं. ॥१४॥

- चिदाभास व ब्रह्म या दोहोंकडून घट प्रकाशित होतो, याविषयीं सूचक चिह्न सांगतात -

चैतन्यं द्विगुणं कुंभे ज्ञातत्वेन स्फुरत्यत: ।
अन्येऽनुव्यवसायाख्यमाहुरेतद्यथोदितम् ॥१५

अन्वयार्थ - [अत:-] घट ब्रह्मचैतन्य व चिदाभास या दोहोंकडून प्रकाशित होत असल्यामुळें [कुंभे ज्ञातत्वेन द्विगुणं चैतन्यं स्फुरति-] कुंभाच्या ठिकाणीं ज्ञातत्वरूपानें द्विगुण चैतन्य भासतें. [यथोदितं एतत् एव अन्ये अनुव्यवसायाख्यं आहु:-] ह्या पूर्वोक्त ब्रह्मचैतन्यालाच तार्किक 'अनुव्यवसाय' या नांवाचें दुसरें ज्ञान म्हणतात.

प्रकाश:- घट हा पदार्थ या स्थळीं उदाहरणार्थ घेतला आहे. 'मी घटज्ञानवान् आहें' या वाक्यांत दोनप्रकारचें चैतन्य कसें आहे, हें पुढच्या श्लोकांतच स्पष्ट होणार आहे. या स्थळीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं न्यायशास्त्रांतील अनुव्यवसाय व या शास्त्रातील ब्रह्मचैतन्य हीं दोन्हीं एकच आहेत. अनुव्यवसाय म्हणजे मागून होणारा शब्दव्यवहार. मी घटत्वानें घटास जाणतों हें त्याचें उदाहरण होय. हें एक प्रत्यक्षादिकांहून भिन्न ज्ञात आहे असें ते मानितात ॥१५॥

-'हा घट' अशा व्यवहारभेदावरूनहि चिदाभास व ब्रह्म यांचा भेद जाणावा, असें सांगतात -

घटोऽयमित्यसावुक्तिराभासस्य प्रसादत: ।
विज्ञातो घट इत्युक्तिर्ब्रह्मानुग्रहतो भवेत् ॥१६

अन्वयार्थ - **[आभासस्य प्रसादत: 'अयं घट:' इति असौ उक्ति: भवति-] चिदाभासाच्या प्रसादामुळें 'हा घट' असें बोलतां येतें [तथा 'घट: विज्ञात:' इति उक्ति: ब्रह्मानुग्रहत: भवेत्-] तसेंच 'घट जाणला' असें ब्रह्माच्या कृपेमुळें म्हणतां येतें.**

प्रकाश:-आभासस्य-प्रमितियुक्त चिदाभासामुळें 'हा घट' असें व ब्रह्मा०-घटाच्या अधिष्ठानभूत ब्रह्मचैतन्यामुळें 'घट जाणला' असें म्हणता येतें. अर्थात् घटज्ञानास दोघांचीहि गरज आहे. ॥१६॥

-देहाच्या बाहेर ब्रह्म व चिदाभास यांचा विवेक जसा केला जातो तसाच देहांतील. कूटस्थ व चिदाभास यांचा विवेक करावा -

आभासब्रह्मणी देहाद्बहिर्यद्वद्विवेचिते ।
तद्वदाभासकूटस्थौ विविच्येतां वपुष्यपि ॥१७

अन्वयार्थ - **[यद्वत् देहात् बहि: आभासब्रह्मणी विवेचिते-] ज्याप्रमाणें देहाच्या बाहेर आभास व ब्रह्म यांचा विवेक-श्लो १३. पृ. ३४५. - केला आहे [तद्वत् आभासकूटस्थौ वपुषि अपि विविच्येताम्-] त्याप्रमाणें देहामध्येंहि आभास व कूटस्थ यांचा विवेक करावा.**

प्रकाश:- या प्रकरणाच्या आरंभीं सूर्यप्रभेचा दृष्टांत देऊन कूटस्थ व चिदाभास यांचें विवेचन जरी सामान्यत: केलें आहे, तरी देहादि पांच कोशांशीं त्यांचें तादात्म्य झाल्यासारखें वाटत असल्यामुळें त्याचा पूर्णपणें विवेक होणेंच इष्ट आहे. कारण त्यावांचून आत्मा व अनात्मा यांचें ज्ञान नि:संशय होणें शक्य नाहीं. म्हणून पुनरपि कूटस्थाचेंच विवेचन विशेषरीत्या चालविलें आहे. ॥१७॥

-'अहोपण, देहाच्या बाहेर चिदाभासयुक्त घटाकारवृत्ति जशी असते तशी देहांतील विषयाला विषय करणारी वृत्ति नसते, तेव्हां त्या वृत्तिस्थ चिदाभासाची कल्पना कशी होऊं शकेल ?' उत्तर -

अहंवृत्तौ चिदाभास: कामक्रोधादिकासु च ।
संव्याप्य वर्तते तप्ते लोहे वह्निर्यथा तथा ॥१८

अन्वयार्थ - **[तप्ते लोहे यथा वह्नि:-] तापलेल्या लोखंडामध्यें जसा अग्नि व्यापून राहतो, [तथा अहंवृत्तौ च कामक्रोधादिकासु-] तसा अहंवृत्ति व कामक्रोधादिक यांमध्यें [चिदाभास: संव्याप्य वर्तते-] चिदाभास सर्वत्र व्यापून राहतो.**

प्रकाश:- देहाच्या बाहेरील पदार्थ स्पष्टपणें भासत असल्यामुळें त्यांना व्यापून राहणाऱ्या चिदाभासाचा जरी स्वीकार करितां आला, तरी देहाच्या आंत मुळीं पदार्थच नसल्यामुळें त्यांना व्यापणाऱ्या चिदाभासाचा कसा अंगीकार करितां येईल ? असें कोणी अविवेकी म्हणेल म्हणून देहाच्या आंतील पदार्थांचा निर्देश करून या श्लोकांत सदृष्टांत विवेचन केलें आहे. अहंकार, काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि सर्व मनोमय भावांस चिदाभास व्यापून सोडतो. तो कसा व्यापितो तें स्पष्टपणें समजावें म्हणून येथें लोखंडांतील अग्नीचा दृष्टांत दिला आहे. म्हणजे तापून लाल झालेल्या लोखंडांत जसा अग्नि सर्वत्र व्यापून राहतो, त्याप्रमाणें हा चिदाभास

अहंकारादि मनोमयवृत्तीमध्यें व्यापून असतो. ॥१८॥

प्रस्तुत दृष्टान्तच अधिक स्पष्ट करून अहंकारादि वृत्ति चिदाभासानें प्रकाशित होतात, हेंच विशद करितात -

स्वमात्रं भासयेत्तप्तं लोहं नान्यत्कदाचन ।
एवमाभाससहिता वृत्तय: स्वस्वभासिका: ॥१९

अन्वयार्थ - [तप्तं लोहं स्वमात्रं भासयेत् अन्यत् कदाचन न-] तापलेलें लोखंड स्वत:ला मात्र भासवितें, दुसऱ्या कोणालाहि कधींच भासवीत नाहीं. **[एवं आभाससहिता; वृत्तय: स्वस्वभासिका: सन्ति-]** त्याचप्रमाणें आभासयुक्त वृत्ति आपणांस मात्र भासणाऱ्या आहेत.

प्रकाश:- काळोखांत एकादा तापून लाल झालेला लोखंडाचा गोळा ठेवून पहावें, म्हणजे तो आपणांस मात्र प्रकाशित करीत असतो व थोड्या अंतरावर असलेल्या दुसऱ्या कोणत्याच पदार्थास प्रकाशित करीत नाहीं असें अनुभवास येतें. त्याचप्रमाणें प्रत्येक वृत्ति आभासयुक्त झाली असतां आपल्या स्वरूपास मात्र प्रकाशित करिते. आभासयुक्त एका वृत्तीस दुसऱ्या वृत्तीचें ज्ञान होत नाहीं. ॥१९॥

-ह्याप्रमाणें चिदाभासाचें स्वरूप सांगून कूटस्थाचें निरूपण करण्याकरिता त्याच्या उपयोगी असलेल्या दोन वृत्तींच्या मधील वृत्त्यभावरूप अवस्था दाखवितात

क्रमाद्विच्छिद्य विच्छिद्य जायन्ते वृत्तयोऽखिला:।
सर्वा अपि विलीयन्ते सुप्तिमूर्च्छासमाधिषु ॥२०

अन्वयार्थ - [अखिला: वृत्तय: क्रमात् विच्छिद्य विच्छिद्य जायन्ते-] सर्व वृत्ति क्रमानें वारंवार विच्छिन्न होऊन उत्पन्न होतात **[तथा ता: सर्वा: अपि सुप्तिमूर्च्छा समाधिषु विलीयन्ते-]** व तशाच त्या सर्वहि सुषुप्ति, मूर्च्छा व समाधि या अवस्थांमध्यें लीन होतात.

प्रकाश:- एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत म्हणजे एका अहोरात्रांत अथवा आठ प्रहरांत मनामध्यें किती वृत्ति उत्पन्न होतात, व किती नाश पावतात याचें गणित करणें अशक्य आहे. पण एकाच कालीं अनेक वृत्ति उत्पन्न होऊं शकत नाहींत. तर प्रत्येक वेळीं क्रमानें एक एक वृत्तीच मनामध्यें उठत असते. यास्तव या श्लोकांत "सर्व वृत्ति वारंवार विच्छिन्न होऊन उत्पन्न होतात" असें म्हटलें आहे. अर्थात् पूर्ववृत्तीचा लय झाल्यावांचून उत्तरवृत्तीचा उदय होत नाहीं. तसेंच पूर्वोक्त आठ प्रहरांतील जो काल सुषुप्ति, मूर्च्छा किंवा समाधि या अवस्थींत जातो, तेवढ्यापुरत्या त्या सर्वहि वृत्ति लीन होऊन राहतात. तस्मात् एका वृत्तीचा लय होऊन दुसऱ्या वृत्तीचा उदय होईतों व सुषुप्ति इत्यादिक अवस्थांमध्यें जो काल जातो त्यांत वृत्तींचा अभाव असतो, असें ठरतें ॥२०॥

-अहोपण, समाध्यादिकांत वृत्तींचा अभाव जरी असला तरी त्यावरून कूटस्थाचें ज्ञान कसें होणार ?' उत्तर -

संघयोऽखिलवृत्तीनामभावाश्चावभासिता: ।
निर्विकारेण येनासौ कूटस्थ इति चोच्यते ॥२१

अन्वयार्थ - [च येन निर्विकारेण अखिलवृत्तीनां संघय: च अभावा: अवभासिता:-] व ज्या निर्विकार आत्म्याकडून सर्व वृत्तींच्या संधी व अभाव प्रकाशित केले जातात **[असौ कूटस्थ: इति उच्यते -]** तो कूटस्थ होय असें म्हणतात.

प्रकाश:- अमुक वेळीं माझी अमुक वृत्ति लीन झाली व त्यानंतर अमुक वेळानें माझ्या मनांत ही अमुक वृत्ति उत्पन्न झाली, असें ज्याच्या योगानें समजतें, व त्याचप्रमाणें सुषुप्ति इत्यादि अवस्थेमध्यें सर्व वृत्तींचा अभाव आहे असें ज्याच्यामुळें निश्चयपूर्वक कळतें आणि वृत्तीमध्यें कसाहि जरी फरक झाला तरी त्यामुळें ज्याच्या स्वरूपांत कधींहि फरक पडत नाहीं, तो कूटस्थ होय. ॥२१॥

-अर्थात् -

घटे द्विगुणचैतन्यं यथा बाह्ये तथान्तरे ।
वृत्तिष्वपि ततस्तत्र वैशद्यं संधितोऽधिकम् ॥२२

अन्वयार्थ - [यथा बाह्ये घटे द्विगुणचैतन्यं तथा आंतरे वृत्तिषु अपि-] ज्याप्रमाणें बाह्य घटादि पदार्थाच्या ठिकाणीं दुप्पट चैतन्य असतें त्याचप्रमाणें तें आंतील वृत्तींमध्येंहि असतें. [ततः तत्र सन्धितः अधिकं वैशद्यं दृश्यते-] त्यामुळें त्यांच्यामध्यें संधीहून अधिक स्पष्टता दिसते.

प्रकाशः- बाह्य पदार्थाच्या ठायीं केवळ त्या पदार्थास भासविणारा चिदभास व त्याच्या ज्ञाततेस भासविणारें ब्रह्मचैतन्य असें दोन प्रकारचें चैतन्य असतें असें पूर्वी सांगितलें आहे. व त्याचप्रमाणें अहंकारादि आंतील वृत्तीमध्येंहि तें असतें असा येथें उल्लेख केला आहे. पण आंतरवृत्तीमध्यें वृत्तीचा अवभासक चिदाभास व कूटस्थ चैतन्य असतें. सर्व वृत्तिज्ञानांमध्यें असें दोन प्रकारचें चैतन्य असल्यामुळें त्यांचा प्रकाश वृत्तीच्या अभावापेक्षां अधिक स्पष्ट होतो. एकाद्या मोठ्या खोलींत एका दिव्याचा जितका उजेड पडतो, त्याच्याहून दोन दिव्यांचा अधिक पडेल हें उघडच आहे. सारांश, वृत्तींची संधि व अभाव यांचें प्रकाशन एकट्या कूटस्थासच करावयाचें असल्यामुळें त्याचा वृत्तीप्रमाणें स्पष्ट प्रत्यय येत नाहीं, तर तो अस्पष्ट असतो. ॥२२॥

-'घटादि बाह्य पदार्थाच्या ठिकाणीं जशी अज्ञातता व ज्ञातता असते त्याप्रमाणेंच ती वृत्तींच्या ठिकाणींहि असते व कूटस्थ त्यांचा अवभासक आहे, असें म्हणण्यास काय हरकत आहे ?' उत्तर -

ज्ञातताज्ञातते न स्तो घटवद्वृत्तिषु क्वचित् ।
स्वस्य स्वेनागृहीतत्वात्ताभिश्चाज्ञाननाशनात् ॥२३

अन्ववार्थ - [स्वस्य स्वेन अगृहीतत्वात् -] आपलें आपल्याकडूनच ग्रहण होत नसल्यामुळें [च ताभिः अज्ञाननाशनात्-] व वृत्तींच्या योगानें अज्ञाना चा नाश होत असल्यामुळें [घटवत् वृत्तिषु ज्ञातताज्ञातते क्वचित् न स्तः-] घटाप्रमाणें वृत्तींच्या ठायीं ज्ञातता व अज्ञातता कधींच नसते.

प्रकाशः- ज्ञान व अज्ञान हीं ज्या पदार्थास व्यापूं शकतात त्यांच्याच ठिकाणीं ज्ञातता व अज्ञातता हे धर्म येतात. घटादि पदार्थ ज्ञान व अज्ञान यांनीं व्याप्त असल्यामुळें त्यांच्या ठायीं जरी हे धर्म येत असले तरी ते वृत्तींच्या ठिकाणीं येऊं शकत नाहींत. कारण वृत्ति स्वप्रकाश असल्यामुळें त्यांना ज्ञान व्यापूं शकत नाहीं व त्यांची उत्पत्ती होतांच त्यांच्याविषयींचें अज्ञान नष्ट होत असल्यामुळें त्यांना अज्ञानहि व्यापीत नाहीं. ॥२३॥

-'अहोपण, चिदाभास व कूटस्थ या दोघांनाहि चित्त्व जर एकसारखेंच आहे तर एक कूटस्थ व दुसरा विकारी असें कसें म्हणतां येईल ?' समाधान -

द्विगुणीकृतचैतन्ये जन्मनाशानुभूतितः ।
अकूटस्थं तदन्यत्तु कूटस्थमविकारतः ॥२४

अन्वयार्थ - **[द्विगुणीकृतचैतन्ये जन्मनाशानभूतितः तत् अकूटस्थं-] द्विगुण झालेल्या चिदाभासरूप चैतन्याचा जन्म व नाश यांचा अनुभव येत असल्यामुळें तें अकूटस्थ [अन्यत् तु अविकारतः कूटस्थम्-] व दुसरें निर्विकार** असल्यामुळें कूटस्थ होय.

प्रकाशः- घटादि पदार्थयुक्त झाल्यामुळें पूर्वोक्तरीत्या ज्यानें चैतन्य दुप्पट केलें आहे अशा चिदाभासामध्यें जन्म व नाश यांचा अनुभव येतो. म्हणजे स्वप्न व जागृति या अवस्थेंत चिदाभास उत्पन्न होत असतो व सुषुप्ति, समाधि इत्यादि अवस्थेंत त्याचा नाश होतो, असें प्रत्यही अनुभवास येतें. यास्तव तें चिदाभासरूप चैतन्य विकारी होय. पण साक्षिचैतन्याचा ह्याप्रमाणें उत्पत्तिविनाशरूप विकार कधींच प्रत्ययास येत नसल्यामुळें तें कूटस्थ चैतन्य

होय. ॥२४॥

-'अहोपण, चिदाभासाहून निराळ्या कूटस्थाचा स्वीकार करण्यास कांहीं प्रमाण नाहीं, ती तुमचीच स्वकपोलकल्पित कल्पना आहे,' असें कोणी म्हणेल म्हणून 'आचार्यांनी कूटस्थाचें उपपादन केलें आहे,' असें सांगतात -

अंत:करणतद्वृत्तिसाक्षीत्यादावनेकधा ।
कूटस्थ एव सर्वत्र पूर्वाचार्यैर्विनिश्चित: ॥२५

अन्वयार्थ - [अंत:करणतद्वृत्तिसाक्षी इत्यादौ अनेकधा पूर्वाचार्यै: सर्वत्र कूटस्थ: एव विनिश्चित: अस्ति-] 'अंत:करणतद्वृत्तिसाक्षी०' इत्यादि **वचनांतून अनेक प्रकारें पूर्वींच्या आचार्यांनीं सर्वत्र कूटस्थाचाच अत्यंत निश्चय केला आहे.**

प्रकाश:- कूटस्थाविषयीं येथें जें प्रतिपादन केलेले आहे, तें संप्रदायास सोडून नाहीं. कारण श्रीमच्छंकराचार्यांचें बृहद्वाक्यवृत्तींत असें वाक्य आहे:- अंत:करणतद्वृत्तिसाक्षी चैतन्यविग्रह: । आनंदरूप: सत्य: सन् किं नात्मानं प्रपद्यसे ॥१॥ याचें तात्पर्य- अंत:करण व त्याच्या वृत्ति यांचा साक्षी, चैतन्याकार, आनंदरूप व सत्य असतांना तूं आत्म्यास कां जाणत नाहींस ? सारांश पूर्वाचार्यांच्या या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक वाक्यांवरूनहि कूटस्थाची सिद्धि होत आहे. ॥२५॥

-त्यांनीं कूटस्थातिरिक्त चिदाभासाचेंहि वर्णन केलें आहे, असें सांगतात-

आत्माभासाश्रयाश्चैवं मुखाभासाश्रया यथा ।
गम्यन्ते शास्त्रयुक्तिभ्यामित्याभासश्च वर्णित: ॥२६

अन्वयार्थ-[यथा मुखाभासाश्रया: एवं आत्माभासाश्रया: शास्त्रयुक्तिभ्यां गम्यन्ते-] **ज्याप्रमाणें मुख, प्रतिबिंब व आश्रय-आरसा ते तीन पदार्थ प्रत्यक्ष दिसतात त्याप्रमाणें आत्मा, आभास व आश्रय-बुद्धि हे तीन पदार्थ शास्त्र व युक्ति यांच्या योगानें ज्ञात होतात,** [इति आभास: च वर्णित:-] **अशा प्रकारें आभासाचेंहि वर्णन केलें आहे.**

प्रकाश:-श्रीमच्छंकराचार्यांच्या उपदेशसाहस्रींत प्रस्तुत श्लोक आहे. पण ग्रंथकारांनीं मूळ श्लोकाचा "आभासासत्वमेव च" हा चवथा चरण काढून त्याच्या जागीं "इत्याभासश्च वर्णित:" हा घातला आहे. म्हणजे या श्लोकाचे पहिले तीन चरण उपदेश साहस्रींतीलच आहेत. आरशामध्यें मुख दिसलें असतां मुख, त्याचें प्रतिबिंब व आरसा ह्या तीन पदार्थांची भावना होते, हें प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच कूटस्थ, चिदाभास व अंत:करणादि आश्रय यांची शास्त्र व युक्ति यांच्या योगानें सिद्धि होते. असा या श्लोकाचा तात्पर्यार्थ असून त्यावरून आचार्यांनाहि चिदाभास मान्य होता, असें ठरतें ॥२६॥

-या चिदाभासाविषयीं आक्षेप -

बुद्ध्यवच्छिन्नकूटस्थो लोकांतरगमागमौ ।
कर्तुं शक्तो घटाकाश इवाभासेन किं वद ॥२७

अन्वयार्थ - [घटाकाश: इव बुद्ध्यवच्छिन्नकूटस्थ: लोकान्तरगमागमौ कर्तुं शक्त:-] **घटाकाशाप्रमाणें बुद्धीच्या योगानें परिच्छिन्न झालेला कूटस्थ अन्य लोकीं जाणें व येणें, हीं करण्यास समर्थ आहे,** [अत: आभासेन किं वद-] **तेव्हां आभासाचा काय उपयोग ? सांग.**

प्रकाश:- व्यापी कूटस्थाच्या ठिकाणीं बुद्धीची कल्पना होते व नंतर कूटस्थाचा जेवढा भाग बुद्धीमध्यें येतो तेवढ्या भागास बुद्ध्यवच्छिन्न असें म्हणतात. याला प्रस्तुत श्लोकांतील घटकाशाचाच दृष्टांत घ्यावा. व्यापी आकाशाचा जेवढा भाग घटामध्यें येतो तेवढ्यास घटाकाश असें म्हणतात. व तें घटाकाश आपल्या उपाधिबरोबर राहून अनेक क्रिया करितें. त्याच्या घटरूप उपाधीस कोठें कोणी नेऊं लागलें असतां तेंहि त्याच्याबरोबर जातें. त्यांस पाण्यांत

बुडविलें असतां तेंहि बुडून जातें; त्याला फोडून टाकिलें असतां तेंहि नष्ट होतें व ह्याप्रमाणें तें घटाकाश घटाचा नित्य सहचारी होऊन राहतें. त्याचप्रमाणें बुद्ध्यवच्छिन्न कूटस्थ बुद्धिसह परलोकीं गमन करणें, पुन: इहलोकीं येऊन कर्मानुरूप फल भोगणें इत्यादि करील. ह्याविषयीं आथर्वणिक म्हणतात- ''बटसंवृतमाकाशं नीयमाने घटे यथा । घटो नीयेत नाकाशस्तद्वज्जीवो नभोपम: ॥ तेवढ्याकरितां निराळ्या- चिदाभासाची कल्पना करण्याचें काय कारण ? असा या श्लोकांत प्रश्न केला आहे. ॥२७॥

-'पण असंग कूटस्थाला केवल बुद्ध्यवच्छेदानें जीवत्व प्राप्त होणें योग्य नाहीं. कारण त्यालाच जीव मानल्यास अतिप्रसंग येतो,' असा सिद्धान्ती पूर्वोक्त आक्षेपाचा परिहार करितात -

शृण्वसंग: परिच्छेदमात्राज्जीवो भवेन्न हि ।
अन्यथा घटकुड्याद्यैरवच्छिन्नस्य जीवता ॥२८

अन्वयार्थ - [शृणु-] ऐक. [असंग: परिच्छेद-मात्रात् जीव: न भवेत् हि-] **असंग कूटस्थ केवल परिच्छिन्न झाल्यामुळें जीव कधींच होणार नाहीं. [अन्यथा घटकुड्याद्यै: अवच्छिन्नस्य जीवता स्यात्-] तो केवल परिछिन्न झाल्यामुळें जीव होतो, असें जर मानलें तर घट, भिंत इत्यादिकांच्या योगानें परिच्छिन्न झालेल्या कूटस्थासहि जीवत्व प्राप्त होईल.**

प्रकाश:- कूटस्थ परिच्छिन्न (मर्यादित) झाला कीं, तेवढ्याच त्याच्या भागास जीवत्व प्राप्त होतें असें म्हणणें अयुक्त आहे. कारण कूटस्थ व्यापी असल्यामुळें तो घटादि दुसऱ्याहि अनेक जड पदार्थांनीं परिच्छिन्न होत असतो; पण त्यांच्याठायीं जीवभाव आल्याचें कोणालाहि ठाऊक नाहीं. ॥२८॥

-'पण बुद्धि व घटादि पदार्थ यांच्यामध्यें स्वच्छत्व व अस्वच्छत्व यांच्या योगानें वैषम्य आहे' अशी शंका व उत्तर -

न कुड्यसदृशी बुद्धि: स्वच्छत्वादिति चेत्तथा ।
अस्तु नाम परिच्छेदे किं स्वाच्छ्येन भवेत्तव ॥२९

अन्वयार्थ - [स्वच्छत्वात् बुद्धि: कुड्यसदृशो न इति चेत्-] स्वच्छ असल्यामुळें बुद्धि भिंतीसारखी नाहीं, असें जर म्हणशील तर [तथा अस्तु नाम-] ती स्वच्छ असेना. [परिच्छेदे स्वाच्छ्येन तव किं भवेत्-] परिच्छेदामध्यें स्वच्छतेमुळें तुला कोणता लाभ होणार ?

प्रकाश:- बुद्धि स्वच्छ आहे व भिंत अति मलिन आहे, यास्तव त्यांची बरोबरी होणार नाहीं असें वाद्याचें म्हणणें आहे. पण सिद्धान्ती म्हणतात कीं, जरी त्यांच्यामध्यें असा फरक असला तरी परिच्छेदामध्यें फरक कसा पडणार ? परिच्छिन्न होणें म्हणजे मर्यादित होणें होय. तेव्हां स्वच्छ पदार्थांच्या योगानें होणारा परिच्छेद व अस्वच्छ पदार्थांच्या योगानें होणारा परिच्छेद यांच्यामध्यें भेद आहे, हें म्हणणें युक्तिसिद्ध नव्हे. ॥२९॥

-हीच गोष्ट दृष्टान्तानें स्पष्ट करितात -

प्रस्थेन दारुजन्येन कांस्यजन्येन वा न हि ।
विक्रेतुस्तण्डुलादीनां परिमाणं विशिष्यते ॥३०

अन्वयार्थ - [विक्रेतु: दारुजन्येन वा कांस्यजन्येन प्रस्थेन तण्डुलादीनां परिमाणं न विशिष्यते हि-] **धान्य विकणाऱ्या वाण्याच्या लांकडी शेरानें किंवा कांशाच्या शेरानें तांदुळादिकांच्या परिमाणांत फरक पडत नाहीं, हें प्रसिद्ध आहे.**

प्रकाश:- लांकूड अस्वच्छ असतें व कासें स्वच्छ असतें हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. पण लाकडाच्या शेरानें परिच्छिन्न होणारे तांदुळ कांशाच्या शेरानें परिच्छिन्न होणाऱ्या तांदुळापेक्षा कमी असतात, असें कोणीहि मानीत नाहीं. या दोन प्रकारच्या मापांमध्ये स्वच्छता व अस्वच्छता यांच्या योगानें जर फरक पडता तर लांकडी माप बाळगणाऱ्या व एका

पारड्यांत दगडाचा शेर घालून जोखणाऱ्या वाण्याचा माल कोणीहि घेतला नसता !! ॥३०॥

-पुनरपि यावर शंका घेऊन समाधान करितात -

परिमाणाविशेषेऽपि प्रतिबिंबो विशिष्यते ।

कांस्ये यदि तदा बुद्धावप्याभासो भवेद्बलात् ॥३१

अन्वयार्थ - [परिमाणविशेषे अपि कांस्ये प्रतिबिंब: विशिष्यते यदि-] परिमाण जरी सारखेंच असलें तरी कांशाच्या शेरांत तांदुळाचे प्रतिबिंब पडतें हा विशेष आहे; असें जर म्हणशील [तदा बुद्धौ अपि आभास: बलात् भवेत्-] तर बुद्धीमध्येंहि आभास अवश्य होईल.

प्रकाश:- लांकडाच्या व कांशाच्या शेराचें परिमाण जरी सारखेंच असलें तरी कांसें अति स्वच्छ असल्यामुळें त्यांत तांदुळादि पदार्थांचें प्रतिबिंब पडतें व अस्वच्छ लांकडामध्यें पडत नाहीं हाच त्यांच्यामध्यें विशेष आहे; असें जर तूं म्हटलेंस तर तें आम्हांस इष्टच आहे. कारण कांसे स्वच्छ असल्यामुळें त्यांत जसें प्रतिबिंब पडतें तसें बुद्धी ही अति स्वच्छ असल्यामुळें जरी इच्छा नसली तरी त्यांत कूटस्थाचें प्रतिबिंब पडेलच व तोच आभास होय. ॥३१॥

-'अहोपण, प्रतिबिंबाचा जरी अंगीकार केला, तरी त्यावरून चिदाभासाचा अंगीकार केला, असें कसें होतें ?' उत्तर -

ईषद्भासनमाभास: प्रतिबिंबस्तथाविध: ।

बिंबलक्षणहीन: सन् बिंबवद्भासते हि स: ॥३२

अन्वयार्थ - [ईषद्भासनं आभास:-] थोडें भासणें हाच आभास होय [च तथाविध: प्रतिबिंब:-] व तशा प्रकारचेंच प्रतिबिंब असतें. [हि स: बिंबलक्षणहीन: सन् बिंबवत् भासते-] कारण तें बिंबलक्षणरहित असून बिंबासारखें भासतें.

प्रकाश:- आभास या शब्दाचा यौगिक अर्थ थोडें भासणें असा आहे. कारण 'आ' याचा अर्थ ईषत्-थोडें व 'भास' याचा भासणें. शब्दामध्यें जे उपसर्ग, प्रत्यय, धातु इत्यादि अवयव असतात त्यांच्यावरून ठरणाऱ्या अर्थास यौगिक अर्थ म्हणतात. असो. हें आभासाचें लक्षण प्रतिबिंबाचे ठायींहि आहे. कारण बिंबाचें लक्षण नसताहि जें बिंबाप्रमाणें भासतें तें प्रतिबिंब होय. तस्मात् थोडेंस भासणें हें लक्षण प्रतिबिंबाचे ठायीं असल्यामुळें आभास व प्रतिबिंब हे पर्याय शब्द होत ॥३२॥

-प्रतिबिंबामध्यें आभासलक्षण कसें आहे तेंच सांगतात -

ससंगत्वविकाराभ्यां बिंबलक्षणहीनता ।

स्फूर्तिरूपत्वमेतस्य बिंबवद्भासनं विदु: ॥३३

अन्वयार्थ - [एतस्य ससंगत्वविकाराभ्यां बिंबलक्षणहीनता-] या चिदाभासाचें ससंगत्व व विकार यांच्या योगानें त्याच्या ठिकाणीं बिंबाच्या लक्षणाची हीनता आहे [च स्फूर्तिरूपत्वं बिंबवत् भासनं विदु:-] व स्फूर्तिरूपत्व हें त्याचें बिंबाप्रमाणें भासणें आहे, असें पूर्व आचार्य समजतात.

प्रकाश:- चिदाभासाच्या ठायीं पूर्वोक्त प्रतिबिंबाचें लक्षण कसें आहे तें येथें सांगितलें आहे. चिदाभास बुद्धिवृत्तींशीं संग ठेवणारा आहे. व तो स्वत: विकारी आहे. त्यामुळे बिंबूभत कूटस्थाचें असंगत्व व निर्विकारित्व हें लक्षण त्याचे ठायीं नाहीं हे उघड झालें. पण त्याच्या ठायीं स्फूर्तिरूपत्व आहे असा प्रत्यय येतो व तेंच त्याचें कूटस्थाप्रमाणें भासणें होय. सारांश बिंबलक्षणशून्य व बिंबाप्रमाणें भासणें हें प्रतिबिंबाचें लक्षण चिदाभासाच्या ठायीं आहे. ॥३३॥

-याप्रमाणें चिदाभासाला मानण्याची आवश्यकता दाखवून आतां तो बुद्धीहून पृथक् विद्यमान आहे, असें सिद्ध करण्यासाठीं वाचस्पतीच्या अनुयायांचा पूर्वपक्ष व त्याचा परिहार -

न हि धीभावभावित्वादाभासोऽस्ति धिय: पृथक्

इति चेदल्पमेवोक्तं धीरप्येवं स्वदेहत: ।।३४

अन्वयार्थ - [धीभावभावित्वात् आभास: धिय: पृथक् न हि अस्ति इति चेत्-] बुद्धीच्या अस्तित्वामुळेंच आभासाचेंहि अस्तित्व असल्यामुळें तो बुद्धीहून भिन्न नाहीं, असें जर म्हणशील तर [अल्पं एव इदं उक्तं-] हें तूं अगदीं थोडेंच बोललास. [यत: एवं धी: अपि स्वदेहत: अभिन्नां-] कारण ह्या न्यायानें बुद्धिहि आपल्या देहाहून अभिन्न आहे.

प्रकाश:- ज्याप्रमाणें मृत्तिकेच्या अस्तित्वामुळेंच अस्तित्वांत येणारा घट मृतिकेहून भिन्न नाहीं, त्याप्रमाणें बुद्धीच्या अस्तित्वानंतर अस्तिवांत येणारा चिदाभासहि तिच्याहून पृथक् नाहीं. तर घट जसा आपल्या उपादान कारणरूपच आहे तसा आभासहि बुद्धिरूप होय. असें वाद्यानें आपल्या मतें सयुक्तिकपणें सिद्ध केलें असतां सिद्धान्ती हंसत म्हणतात कीं, छे, ह्यांत काय अर्थ आहे ? हें तूं कांहींच बोलला नाहींस. याच्या पेक्षांहि तुझी कल्पना जरा पुढें जावयास पाहिजे होती. कारण देहानंतर बुद्धीचा उद्भव होत असल्यामुळें व तिला देहाच्या अस्तित्वाचीहि आवश्यकता असल्यामुळें देह व बुद्धि एकच आहेत असें म्हणणेंहि प्रस्तुत दृष्ट्या अयोग्य झालें नसतें. ।।३४।।

-यावर पुन: शंका व समाधान -

देहे मृतेऽपि बुद्धिश्चेच्छास्त्रादस्ति तथा सति ।
बुद्धेरन्यश्चिदाभास: प्रवेशश्रुतिषु श्रुत: ।।३५

अन्वयार्थ - [देहे मृते अपि शास्त्रात् बुद्धि: अस्ति इति चेत्-] देह मृत झाल्यावरहि बुद्धि असते; असें शास्त्रावरून ठरतें असें जर म्हणशील तर [तथा सति प्रवेशश्रुतिषु बुद्धे: अन्य: चिदाभास: श्रुत: अस्ति-] तसें असल्यास प्रवेशश्रुतींमध्यें बुद्धीहून निराळा चिदाभास सांगितलेला आहे.

प्रकाश:- बुद्धीहून देह भिन्न आहे. कारण देह निर्जीव झाल्यावरहि बुद्धि असते; असें शास्त्र सांगतें. असें वाद्याचें म्हणणें आहे. पण सिद्धान्ती म्हणतात - शास्त्र सांगतें म्हणून पूर्वोक्त युक्ति सोडूनहि जर देह व बुद्धि यांची भिन्नता स्वीकारावयाची असली तरी ''आत्मा हें सर्व निर्माण करून त्यांत प्रवेश करिता झाला'' या प्रवेश-श्रुतीमध्यें तसें स्पष्टपणें सांगितलेलें असल्यामुळें बुद्धीहून आभास भिन्न आहे असें समजण्यास काय प्रत्यवाय आहे ? सारांश शास्त्र-देहाहून बुद्धि भिन्न आहे-हें जसें सांगत आहे, तसेंच तें शास्त्र बुद्धीहून आभास भिन्न आहे, असेंहि प्रतिपादन करीत आहे. ।।३५।।

-'अहोपण, बुद्ध्युपाधिक आत्म्याचाच प्रवेश होणें युक्त आहे, दुसऱ्या कोणाचाहि नव्हे, अशी शंका घेऊन तिचें समाधान -

धीयुक्तस्य प्रवेशश्चेन्नैतरेये धिय: पृथक् ।
आत्मा प्रवेशं संकल्प्य प्रविष्ट इति गीयते ।।३६

अन्वयार्थ - [धीयुक्तस्य प्रवेश: इति चेत् न-] बुद्धियुक्त कूटस्थाचाच प्रवेश होतो, असें जर म्हणशील तर तें बरोबर नाहीं. [यत: ऐतरेये धिय: पृथक् आत्मा प्रवेशं संकल्प्य प्रविष्ट: इति गीयते-] कारण ऐतरेयोपनिषदांत 'बुद्धीहून पृथक् आत्मा प्रवेशाचा संकल्प करून तिच्यामध्यें प्रविष्ट झाला' असें सांगितलें आहे.

प्रकाश:- बुद्धियुक्त कूटस्थ व सृष्टींत प्रविष्ट झाला असें कोठेंहि सांगितलेलें नाहीं. उलट ऐतरेयामध्यें बुद्धीहून भिन्न असणाऱ्या आत्म्यानें प्रथम प्रवेशाचा संकल्प केला व नंतर प्रवेश केला असें स्पष्टपणें वर्णन केलेलें आहे. ।।३६।।

-पूर्वोक्त ऐतरेय श्रुतीचाच येथें अर्थत: निर्देश करितात-

कथं न्विदं साक्षदेहं मदृते स्यादितीरणात् ।
विदार्य मूर्धसीमानं प्रविष्ट: संसरत्ययम् ।।३७

अन्वयार्थ - [अयं 'इदं साक्षदेहं मदृते कथं नु स्यात्' इति मूर्धसीमानं विदार्य प्रविष्ट: संसरति इति

ईरणात्-] हा परमात्मा 'इंद्रियें, देह इत्यादिकांसह हा जडसमूह माझ्यावांचून कसा व्यवहार करूं शकेल' असा विचार करून व मस्तकावरील तालू फोडून आंत प्रविष्ट होत्साता संसार करूं लागला, असें वर्णन केलें आहे.

प्रकाश:- सर्व सृष्टीची उत्पत्ति केल्यावर, चेतन जो मी त्या मजवांचून हा जडवर्ग व्यवहार करूं शकणार नाहीं; असें समजून तो परमात्मा देहांत प्रवेश करिता झाला. त्यानें कोणत्या मार्गानें प्रवेश केला हे श्रुतीमध्येंच स्पष्टपणें सांगितलेलें आहे; व त्याचाच येथेंहि निर्देश केला आहे. तो असा-मस्तकाच्या मध्यभागीं जेथें तीन कवट्या मिळलेल्या आहेत असें दिसतें किंवा लहान मुलांच्या मस्तकावरील जो भाग जन्मानंतर मऊ असतो व ज्यास व्यवहारांत टाळु म्हणतात तिचें विदारण करून यानें शरीरांत प्रवेश केला व नंतर जाग्रदादि अवस्थांचा अनुभवरूप संसार करूं लागला. ॥३७॥

-'पण असंग आत्म्याचा प्रवेश संभवत नाहीं,' अशी शंका घेऊन समाधान -

कथं प्रविष्टोऽसंगश्चेत्सृष्टिर्वाऽस्य कथं वद ।
मायिकत्वं तयोस्तुल्यं विनाशश्च समस्तयो: ॥३८

अन्वयार्थ - [असंग: कथं प्रविष्ट: इति चेत्-] असंग आत्मा प्रविष्ट कसा झाला, असें जर म्हणशील तर [अस्य सृष्टि: वा कथं वद-] याची सृष्टि तरी कशी ? सांग. [तयो: मायिकत्वं तुल्यं च तयो: विनाश: सम:-] सृष्टिकर्ता व प्रवेशकर्ता यांचें मायिकत्व समान आहे. कारण त्यांचा विनाशहि सारखाच !

प्रकाश:- असंग आत्म्याचा कोणत्याहि कार्यांत प्रवेश होणें अशक्य आहे असें जर म्हणावें तर तो असंग आत्मा कार्याचा कर्ता तरी कसा होणार ? हा प्रश्न पुढें येतो. सृष्टिकर्ता मायिक असल्यामुळें त्याला कर्ता होतां येतें असें जर म्हणावें तर प्रवेशकर्ता तरी अमायिक कोठें आहे ? सारांश त्यांचें मायित्व व निवृत्ति हे भाव सारखेच आहेत. ॥३८॥

-औपाधिक स्वरूपाचें विनाशित्व प्रतिपादन करणाऱ्या 'प्रज्ञानघन एव०' इत्यादि श्रुतीचा निर्देश करितात -

समुत्थायैष भूतेभ्यस्तान्येवानुविनश्यति ।
विस्पष्टमिति मैत्रेय्यै याज्ञवल्क्य उवाच हि ॥३९

अन्वयार्थ - [एष: भूतेभ्य: समुत्थाय तानि एव अनुविनश्यति-] हा भूतांपासून उत्पन्न होऊन त्यांच्याच मागोमाग नष्ट होतो, [इति याज्ञवल्क्य: मैत्रेय्यै विस्पष्टं उवाच हि-] असें याज्ञवल्क्य मैत्रेयीला स्पष्टपणें सांगते झाले, हें प्रसिद्ध आहे.

प्रकाश:- हा प्रज्ञानघन आत्मा या देहेंद्रियादिरूप पंचभूतांच्या कार्यापासून निघून म्हणजे जीवभावाप्रत प्राप्त होऊन त्या देहेंद्रिय संज्ञक कार्यांच्या मागोमाग म्हणजे तीं नष्ट होतांच आपणहि नष्ट होतो. ''मी जीव आहें'' हा अभिमान सोडणें हाच याचा नाश होय. सारांश याप्रमाणें सोपाधिक आत्म्याचें विनाशित्व याज्ञवल्क्यांनीं मैत्रेयीस सांगितलें आहे. ॥३९॥

-त्याचप्रमाणें 'अविनाशी वा०' या श्रुतीनें कूटस्थ त्याहून भिन्न आहे, असें सांगितलें आहे, असें सांगतात -

अविनाश्ययमात्मेति कूटस्थ: प्रतिवेचित: ।
मात्रासंसर्ग इत्येवमसंगत्वस्य कीर्तनात् ॥४०

अन्वयार्थ - [अविनाशी अयं आत्मा इति कूटस्थ: प्रविवेचित:-] हा आत्मा अविनाशी आहे, असें म्हणून कूटस्थ त्याहून अगदीं भिन्नत्वानें सांगितलेला आहे. [मात्रासंसर्ग: इति एवं असंगत्वस्य कीर्तनात्-] देहादिकांशीं कांहीं संबंध नसतो, असें म्हणून त्याच्या अविनाशित्वाचें

असंगत्व हें कारण सांगितलें आहे.

प्रकाश - 'अविनाशी वा अरे' इत्यादि कण्वशाखेची श्रुति असून 'मात्रासंसर्गः' ही माध्यंदिन शाखेची श्रुति आहे. मात्रासंसर्ग - म्हणजे देहादि पदार्थांशीं संबंध न ठेवणारा. या दोन्ही वाक्यांवरून आत्मा कूटस्थ आहे असें स्पष्ट होतें. ॥४०॥

-'अहोपण 'जीवापेतं०' या श्रुतीनें औपाधिक जीवाचेंहि अविनशित्व सांगितलें आहें,' अशी शंका घेऊन तिचें समाधान -

जीवापेतं वाव किल शरीरं म्रियते न सः ।
इत्यत्र न विमोक्षोऽर्थः किंतु लोकांतरे गतिः ॥४१

अन्वयार्थ - [जीवापेतं वाव किल शरीरं म्रियते न सः-] 'जीवरहित असें हें शरीर मरतें, जीव मरत नाहीं' [इति अत्र न विमोक्षः अर्थः किंतु लोकान्तरे गतिः-] या श्रुतीमध्यें मोक्षरूप अर्थ सांगितलेला नाहीं तर परलोकांतील गति सांगितली आहे.

प्रकाशः- 'जीवापेतं' इत्यादि श्रुतीमध्यें जीव मरत नाहीं असें जें म्हटलें तें जीवास परलोकप्राप्ति होते हें सांगण्याकरितां आहे. त्यास अत्यंत नाशरूप मोक्षहि मिळत नाहीं हें सांगण्याकरितां नव्हे. शरीर जरी निर्जीव झालें तरी जीव नष्ट होत नाहीं तर तो आत्मसाक्षात्कार होई तोपर्यंत अनेक देहांचा स्वीकार करून अनेक लोकीं हिंडत राहतो; असा या वाक्याचा भावार्थ आहे. ॥४१॥

-'पण जीव विनाशी आहे, असें जर मानलें तर त्याचें अविनाशी ब्रह्माशीं 'मी ब्रह्म आहें' असें तादात्म्यज्ञान कसें होऊं शकेल ?' उत्तर -

नाहं ब्रह्मेति बुध्येत स विनाशीति चेन्न तत् ।
सामानाधिकरण्यस्य बाधायामपि संभवात् ॥४२

अन्वयार्थ - [सः विनाशी 'अहं ब्रह्म' इति न बुद्ध्येत इति चेत्-] तो विनाशी जीव 'मी ब्रह्म आहें' असें जाणणार नाहीं, असें जर म्हणशील तर [तत् न-] तें बरोबर नाहीं [सामानाधिकरण्यस्य बाधायां अपि संभवात्-] कारण समानाधिकरणभाव बाधप्रसंगींहि संभवतो.

प्रकाश- भिन्न अर्थाचे दोन शब्द एकाच विभक्तीमध्यें येऊन त्यांच्यामध्यें जर विशेषणविशेष्यभाव असला तर ते दोन्ही 'समानाधिकरण' होत. जसें - चांगला घोडा. अथवा एका आश्रयावर राहणाऱ्या अनेक धर्मांमध्यें सामानाधिकरण्य असतें. जसें गाईवर राहणारे गाईपणा, लाली, गरीबपणा इत्यादि धर्म परस्पर समानाधिकरण आहेत. म्हणजे त्यांच्यामध्यें सामानाधिकरण्य संबंध आहे. किंवा परस्पर अभिन्न अशा पदार्थांमध्यें जो अभिन्नतारूप संबंध असतो त्यासहि सामानाधिकरण्य म्हणतात. जसें कार्य व कारण यांचें वेदान्त व सांख्य शास्त्रांत ऐक्य मानलेलें असल्यामुळें त्यांच्यामध्यें सामानधिकरण्य संबंध आहे. या सामानाधिकरण्याचे मुख्य (१) सामानाधिकरण्य व (२) बाध सामानाधिकरण्य असे दोन भेद आहेत. दोन अभिन्न वस्तूंमध्यें जें सामानाधिकरण्य असतें तें 'मुख्य' होय. उदाहरणार्थ - घटाकाश व महाकाश यांचें नित्य तादात्म्य असतें व त्यामुळें त्यांच्यामध्यें मुख्य सामानाधिकरण्य आहे. भ्रामक वस्तूचा बाध होऊन नंतर तिचा ज्या अधिकरणांशीं अभेद (तादात्म्य) होतो त्याच्याशीं तिचें 'बाध सामानाधिकरण्य' असतें. जसा रज्जूवर भासलेल्या सर्पाचा बाध होऊन त्यांचें रज्जूंशीं तादात्म्य होतें किंवा आरशांत भासलेल्या प्रतिबिंबाचा बाध होऊन तें बिंबभूत पदार्थाशीं अभिन्न होतें. अशा प्रकारच्या सामानाधिकारण्यास 'बाध सामानाधिकरण्य' म्हणतात. कूटस्थ व ब्रह्म यांच्यामध्यें घटाकाश व महाकाशाप्रमाणें मुख्य सामानाधिकरण्य आहे. कूटस्थ व ब्रह्म यांचा घटाकाश व महाकाशाप्रमाणेंच संबंध आहे हें चित्रदीपाच्या अठराव्या श्लोकांत सांगितलें आहे. तरी त्याचें ज्यांस विस्मरण झालें असेल त्यांनीं सहाव्या प्रकरणाचा अठरावा श्लोक पहावा. असो. प्रस्तुत श्लोकांत विनाशी जीवास 'मी ब्रह्म आहें' अशा प्रकारें ज्ञान होणें शक्य नाहीं असें वाद्याचें म्हणणें आहे व

विनाशी मी आणि अविनाशी ब्रह्म यांचें एकविभक्तिप्रयुक्त सामानाधिकरण्य होणें अशक्य आहे; ही युक्ति त्यानें स्वमतपुष्ट्यर्थ योजिली आहे. पण सिद्धान्ती म्हणतात की, यांचें मुख्य सामानाधिकरण्य जरी अशक्य असलें तरी 'बाधसामानाधिकरण्य' अशक्य नाहीं. यास्तव 'मी ब्रह्म आहें' या वाक्यांतील मी व ब्रह्म या दोन वस्तूंचें 'बाधसामानाधिकरण्य' आहे असें आम्ही म्हणतों. ॥४२॥

-बाधसामानाधिकरण्यानें वाक्यार्थज्ञानाचा प्रकार वार्तिककारांनीं सदृष्टान्त सांगितला आहे, असें त्यांच्या वाक्याचा अनुवाद करून सांगतात -

योऽयं स्थाणुः पुमानेष पुंधिया स्थाणुधीरिव ।
ब्रह्मास्मीति धियाशेषाप्यहंबुद्धिर्निवर्त्यते ॥४३

अन्वयार्थ - ['यः अयं स्थाणुः एषः पुमान्'-] 'जो हा स्थाणु म्हणून तूं समजत होतास तो पुरुष आहे' [इति अत्र पुंधिया स्थाणुधीः इव-] या वाक्यामध्यें पुरुषबुद्धीच्या योगानें स्थाणुबुद्धि जशी निवृत्त होते; त्याप्रमाणें ['ब्रह्म अस्मि' इति धिया अशेषा अपि अहंबुद्धिः निवर्त्यते-] 'मी ब्रह्म आहें' या बुद्धीच्या योगानें सर्वहि अहंबुद्धि निवृत्त केली जाते.

प्रकाशः- वृक्षाच्या शाखा तोडून टाकल्यावर जें नुस्तें खोड उभें असतें त्याला स्थाणु म्हणतात. मराठीमध्ये याला खुंट असें म्हणण्याचा प्रघात आहे. अंधाऱ्या रात्रीं भ्रमामुळें अशा प्रकारचा खुंट, पुरुष असावा असें वाटण्याचा संभव आहे तसाच एकादा पुरुष उभा असतांना 'हा खुंट आहे' असा भास होण्याचाहि संभव आहे. व प्रस्तुत श्लोकांत ह्या दुसऱ्या प्रकारचाच दृष्टान्त दिला आहे. 'अरे बाबा, तूं ज्याला खुंट किंवा लांकडाचा खांब म्हणून समजत आहेस तोच अमुक अमुक मनुष्य होय.' असें कोणी सांगितलें असतां ऐकणाऱ्याच्या मनांत पुरुषाविषयींची भावना उत्पन्न होते व स्थाणूविषयींची नष्ट होते. हा दृष्टांत होय. म्हणजे याप्रमाणेंच 'मी ब्रह्म आहें; संसारी जीव नव्हे.' अशी बुद्धि झाली असतां तिच्या योगानें अहंबुद्धि समूळ नष्ट होते. व त्यामुळें तत्त्वमस्यादि सर्व महावाक्यांतील पदांचें 'बाधसामानाधिकरण्य' सिद्ध होतें. हें वार्तिककार श्रीसुरेश्वराचार्यांचें नैष्कर्म्य सिद्धींतील वाक्य आहे व स्वतः ग्रंथकारहि हें पुढच्याच श्लोकांत सांगत आहेत. ॥४३॥

-सारांश -

नैष्कर्म्यसिद्धावप्येवमाचार्यैः स्पष्टमीरितम् ।
सामानाधिकरण्यस्य बाधार्थत्वमतोऽस्तु तत् ॥४४

अन्वयार्थ - [एवं आचार्यैः नैष्कर्म्यसिद्धौ अपि सामानाधिकरण्यस्य बाधार्थत्वं स्पष्टं ईरितम्-] मागच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें आचार्यांनीं नैष्कर्म्यसिद्धीमध्येंहि सामानाधिकरण्याची बाधार्थता स्पष्टपणें सांगितलेली आहे. [अतः तत् अस्तु-] यास्तव 'ब्रह्माहमस्मि' या वाक्यांत ती असो.

प्रकाशः- आचार्य या शब्दाची व्याख्या अशी आहे -

आचिनोति च शास्त्रार्थमाचारे स्थापयत्यपि ।
स्वयमप्याचरेद्यस्तु स आचार्य इति स्मृतः ॥

याचा अर्थ :- जो शास्त्राचा अर्थ व्यवस्थित करितो व त्याची आचारामध्यें प्रस्थापना करवितो आणि स्वतःहि तसें आचरण करितो त्यास आचार्य असें म्हटलें आहे.

या व्याख्येप्रमाणें श्रीसुरेश्वराचार्य आचार्य ह्या पदवीस पात्र होते; हें कोणीहि कबूल करील. त्यांच्या नैष्कर्म्यसिद्धिनामक ग्रंथामध्यें दुसऱ्या अध्यायांत मागचा श्लोक असल्यामुळें श्रीभारतीतीर्थ म्हणतात कीं प्रस्तुत आचार्यांच्या वचनाप्रमाणें 'मी ब्रह्म आहें' या वाक्यांतील मी व ब्रह्म या पदांच्या सामानाधिकारण्याचाहि बाध हाच अर्थ असो. ॥४४॥

-'अहोपण, असें जरी असलें तरी श्रुतींत बाधसामानाधिकरण्य कोठेंच आढळत नाहीं,' अशी

आशंका घेऊन म्हणतात -

सर्वं ब्रह्मेति जगता सामानाधिकरण्यवत् ।
अहं ब्रह्मेति जीवेन सामानाधिकृतिर्भवेत् ।।४५

अन्वयार्थ - ['सर्वं ब्रह्म' इति जगता सामानाधिकरण्यवत् -] 'सर्व ब्रह्म आहे' या वाक्यांत जगाशीं ब्रह्माचें सामानाधिकरण्य जसें आहे. ['अहं ब्रह्म' इति जीवेन सामानाधिकृतिः भवेत्-] त्याप्रमाणें 'मी ब्रह्म आहें' या वाक्यांत जीवाशीं ब्रह्माचें सामानाधिकरण्य आहे.

प्रकाशः- मांडुक्योपनिषदामध्यें 'सर्वं हि एतत् ब्रह्म' असें वाक्य आहे. काण्वशाखीय बृहदारण्यकांत 'इदं सर्वं यदयमात्मा' असें वाक्य आहे. व 'हें सर्व ब्रह्म आहे' 'हें जें कांहीं सर्व जग आहे तें आत्माच आहे' असा त्यांचा क्रमानें भावार्थ आहे. या श्रुतिवाक्यावरून जग व ब्रह्म यांच्या सामानाधिकरण्याची सिद्धि होते हें कोणीहि कबूल करील. पण तें 'मुख्य' आहें कीं 'बाध' आहे याच्याविषयीं मात्र विचार केला पाहिजे. त्यांचे मुख्य सामानाधिकरण्य जर मानलें तर ब्रह्महि दृश्य, विकारी, विनाशीं इत्यादि होऊं लागेल. पण तें सिद्धान्ताच्या व अनेक श्रुतींच्या विरुद्ध असल्यामुळें अनिष्ट आहे. यास्तव जगाचा बाध करून त्याचें ब्रह्माशीं ऐक्य होणेंच युक्त आहे. अर्थात् आभासवाद श्रुतीलाहि मान्य आहे असें यावरून ठरतें. आतां श्रीमच्छंकराचार्यांचें मत ज्या कोणास पहावयाचें असेल त्यानें प्रस्तुत श्रुतीवरील भाष्य पहावें. म्हणजे निर्णय होईल. सारांश ब्रह्माचें जगाशीं जसें सामानाधिकरण्य आहे तसेंच तें जीवाशींहि आहे असेंहि समजावें ।।४५।।

-'तर मग श्रीप्रकाशात्ममुनींनीं विवरणामध्यें बाधसामानाधिकरण्याचें निराकरण कसें केलें आहे ?' उत्तर -

सामानाधिकरण्यस्य बाधार्थत्वं निराकृतम् ।
प्रयत्नतो विवरणे कूटस्थत्वविवक्षया ।।४६

अन्वयार्थ - [विवरणे कूटस्थत्वविवक्षया सामानाधिकरण्यस्य बाधार्थत्वं प्रयत्नतः निराकृ-तम्-] विवरणामध्यें कूटस्थतेचें प्रतिपादन करण्याच्या इच्छेनें सामानाधिकरण्याला बाधार्थत्व नाहीं, असें म्हणून त्यांचें प्रयत्नपूर्वक निराकरण केलें आहे.

प्रकाशः- 'अहं ब्रह्मास्मि' या वाक्यांतील निरुपाधिक अहं शब्दाचा जो अर्थ तोच कूटस्थ आहे, असें सांगण्याची इच्छा असल्यामुळें त्यांनीं आपल्या विवरणांत अहं व ब्रह्म यांच्या बाधसामानाधिकरण्याचें निराकरण केलें आहे. पण त्यावरून सोपाधिक अहं व ब्रह्म यांचें बाधसामानाधिकरण्य नाहीं असें ठरत नाहीं. कारण विवरणकारहि प्रतिबिंबवादी आहेत असें त्यांच्याच ग्रंथावरून निश्चित होत असून आभासवाद व प्रतिबिंबवाद एकच आहे हें पूर्वीं तेतिसाव्या श्लोकांत स्पष्ट झालेंच आहे. ।।४६।।

-'कूटस्थत्वविवक्षया' या उक्तार्थाचेंच विवरण -

शोधितस्त्वंपदार्थो यः कूटस्थो ब्रह्मरूपताम् ।
तस्य वक्तुं विवरणे तथोक्तमितरत्र च ।।४७

अन्वयार्थ - [यः शोधितः त्वंपदार्थः कूटस्थः तस्य ब्रह्मरूपतां वक्तुं-] जो बुद्ध्यादिकांहून भिन्न केलेला 'त्वं-'पदाचा लक्ष्य अर्थ कूटस्थ त्याला ब्रह्मरूपत्व आहे असें सांगण्याकरितां [विवरणे च इतरत्र तथा उक्तं-] विवरणांत व दुसऱ्याहि कांहीं ग्रंथांत तशा प्रकारें सांगितलें आहे.

प्रकाशः- कूटस्थ बुद्ध्यादिकांहून भिन्न आहे. तो 'त्वं' या पदाचा लक्ष्य अर्थ आहे असें विचारानें समजतें. व अशा प्रकारचा कूटस्थ ब्रह्मरूपच आहे. म्हणजे त्यांचें मुख्य सामानाधिकरण्य आहे; बाधसामानाधिकरण्य नव्हे; असें सांगण्याकरितां विवरणकारांनीं व भामतीकारादि दुसऱ्या कांहीं ग्रंथकारांनींहि तसें म्हटलें आहे. ।।४७।।

-आता कूटस्थाचें ब्रह्माशीं ऐक्य संभवते हें दाखविण्यासाठीं 'कूटस्थ-' शब्दाचा आभासवादांतील विवक्षित अर्थ सांगतात -

देहेंद्रियादियुक्तस्य जीवाभासभ्रमस्य या ।
अधिष्ठानचितिः सैषा कूटस्थात्र विवक्षिता ।।४८

अन्वयार्थ - [देहेंद्रियादियुक्तस्य जीवभासभ्रमस्य या अधिष्ठानचितिः-] देह, इंद्रियें इत्यादिकांनीं युक्त अशा जीवाभासरूप भ्रमाची जी अधिष्ठानरूप चिति-चैतन्य [सा एषा अत्र कूटस्था विवक्षिता-] तीच ही येथें 'कूटस्थ' म्हणून विवक्षित आहे.

प्रकाशः- देहादि उपाधींनीं युक्त असा चिदाभास भ्रमरूप असल्यामुळें त्याचें कांहींतरी अधिष्ठान असलें पाहिजे. कारण अधिष्ठानावांचून भ्रम होत नाहीं असें मागें सांगितलेंच आहे. चिदाभासाचें अधिष्ठान चैतन्यरूप असणेंच युक्त आहे. व हें अधिष्ठानभूत चैतन्यच या आभासवादांतील कूटस्थ होय. ।।४८।।

- आतां 'ब्रह्म-' शब्दाचा अर्थ सांगतात -

जगद्भ्रमस्य सर्वस्य यदधिष्ठानमीरितम् ।
त्रय्यन्तेषु तदत्र स्याद्ब्रह्मशब्दविवक्षितम् ।।४९

अन्वयार्थ - [त्रय्यन्तेषु सर्वस्य जगद्भ्रमस्य यत् अधिष्ठानं ईरितं -] वेदान्तामध्यें सर्व जगद्रूप भ्रमाचें जें अधिष्ठान सांगितलेलें आहे [तत् अत्र ब्रह्मशब्दविवक्षितं स्यात्-] तें येथें ब्रह्मशब्दानें विवक्षित आहे.

प्रकाशः- विवक्षित म्हणजे सांगावयास इच्छिलेलें. जगद्रूपभ्रमाचें जे चैतन्य अधिष्ठान आहे असें वेदान्तांत निरूपण केलें आहे त्यासच या आभासवादांत ब्रह्म असें म्हटलें आहे, असा याचा भावार्थ होय. ।।४९।।

-'पण जीवाभासाचें अधिष्ठान चैतन्य कूटस्थ आहे हें म्हणणेंच संभवत नाहीं. कारण जीवाचा कूटस्थावर आरोप झालेला आहे. हें म्हणणेंच असिद्ध आहे,' अशी शंका घेऊन तिचें समाधान -

एतस्मिन्नेव चैतन्ये जगदारोप्यते यदा ।
तदा तदेकदेशस्य जीवाभासस्य का कथा ।।५०

अन्वयार्थ - [एतस्मिन् एव चैतन्ये यदा जगत् आरोप्यते-] याच ब्रह्मचैतन्याचे ठिकाणीं जगाचाहि जर आरोप केला जात आहे [तदा तदेकदेशस्य जीवभासस्य का कथा -] तर मग त्याच्या एकदेशभूत जीवाभासाच्या आरोपाची काय कथा ।

प्रकाशः- सर्व जग ब्रह्माचे ठायीं आरोपित आहे हें नुक्तेंच पंचेचाळीसाच्या श्लोकांत व त्याच्या मागेहि अनेकदा श्रुतियुक्तिद्वारा सिद्ध झालें आहे. सर्व जगच जर आरोपित आहे तर त्याचाच एक भाग जो जीव तो आरोपित नाहीं असें कसें म्हणतां येईल ? ।।५०।।

-अहोपण, जगाचें अधिष्ठान चैतन्य एक आहे. त्यामुळें 'तत्त्वं-'पदार्थांचा भेद नाहीं. अर्थात् 'तत्त्वं-' पदार्थांवर पुनरुक्ति दोष येतो,' अशी शंका घेऊन समाधान-

जगत्तदेकदेशाख्यसमारोप्यस्य भेदतः ।
तत्त्वंपदार्थौ भिन्नौ स्तो वस्तुतस्त्वेकता चितेः ।।५१

अन्वयार्थ - [जगत्तदेकदेशाख्यसमारोप्यस्य भेदतः-] जगत् व त्याचा एकदेश या नांवाचें जें आरोप्य त्याच्या भेदामुळें [तत्त्वंपदार्थौ भिन्नौ स्तः-] 'तत्'-पदाचा व 'त्वं-' पदाचा अर्थ भिन्न झाला आहे. [वस्तुतः तु चितेः एकता अस्ति-] पण वस्तुतः चैतन्याचें ऐक्य आहे.

प्रकाशः- आरोप्य म्हणजे ज्याचा आरोप करावयाचा आहे असा पदार्थ. अर्थात् प्रस्तुत स्थळीं जग व त्याचा एक भाग-जीवाभास. या आरोप्यामध्यें भेद असल्यामुळें त्याच्या अपेक्षेनें अधिष्ठानामध्येंहि भेद पडतो. पण तो भेदहि आभासिक आहे, खरा नव्हे. ।।५१।।

-'अहोपण, शुक्तिरजतादिकांप्रमाणें चिदाभासामध्यें अधिष्ठान व आरोप्य यांचे धर्म दिसत नाहींत, मग त्याला अध्यारोप कसें म्हणतां येईल ?' उत्तर -

कर्तृत्वादीन्बुद्धिधर्मान्स्फूर्त्याख्यां चात्मरूपताम्।
दधद्विभाति पुरत आभासोऽतो भ्रमो भवेत् ॥५२

अन्वार्थ - [कर्तृत्वादीन् बुद्धिधर्मान् -] कर्तृत्वादिक बुद्धीचे धर्म [च स्फूर्त्याख्यां आत्मरूपतां-] व स्फूर्तिसंज्ञक आत्म्याचें स्वरूप यांस [दधत् आभास: पुरत: विभाति:-] धारण करणारा आभास स्पषट भासतो [अत; स: भ्रम: भवेत्-] यास्तव तो भ्रम आहे.

प्रकाश- दोरीच्या अज्ञानामुळें भासणाऱ्या सर्पांत कांहीं धर्म दोरीचे असतात व कांहीं सर्पाचे असतात. जसें-जाडी, लांबी व 'हा' हा 'इदं अंश' इत्यादि दोरीचे धर्म असून भ्रमामुळें भासणारी त्याची चळवळ, तोंडाकडील व मागचा भाग इत्यादि सर्पाचे धर्म असतात; व त्यामुळें त्यास 'भ्रम' असें म्हणतात. त्याचप्रमाणें चिदाभासाचें ठायी कर्तृत्व, भोक्तृत्व, इत्यादि बुद्धीचे धर्म व स्फूर्ति हा आत्मधर्म अगदीं स्पष्टपणें प्रत्ययास येतो; व त्यामुळें तो भ्रम आहे असें ठरतें ॥५२॥

-'या भ्रमाचें कारण काय ?' अशी आकांक्षा झाली असतां 'बुद्ध्यादिकांच्या स्वरूपाचें ज्ञान नसणें' हेंच त्याचें कारण सांगतात -

का बुद्धि:कोऽयमाभास: को वात्माऽत्र जगत्कथम्।
इत्यनिर्णयतो मोह: सोऽयं संसार इष्यते ॥५३

अन्वयार्थ - [का बुद्धि: क: अयं आभास: अत्र क: वा आत्मा कथं जगत्-] बुद्धि कोण आहे ? हा आभास कोण आहे ? अथवा यांतील आत्मा कोण आहे ? व जगत् कसें आहे, [इति अनिर्णयत: य: मोह: स: अयं संसार: इष्यते-] यांचा निर्णय न झाल्यामुळें होणारा जो मोह तोच हा संसार होय.

प्रकाश:- बुद्ध्यादिकांचा निर्णय न होणें हाच मोह असून तो संसार आहे. आणि संसार अनर्थाचें कारण असल्यामुळें त्याची निवृत्ति करणेंच योग्य आहे. तात्पर्य बुद्ध्यादिकांचें स्वरूप न समजणें हेंच संसारभ्रमाचें कारण आहे. ॥५३॥

-'पण या मोहरूप संसाराची निवृत्ति कशी होणार ?' उत्तर -

बुद्ध्यादीनां स्वरूपं यो विविनक्ति स तत्त्ववित्।
स एव मुक्त इत्येवं वेदान्तेषु विनिश्चय: ॥५४

अन्वयार्थ - [बुद्ध्यादीनां स्वरूपं य: विविनक्ति स: तत्त्ववित्-] बुद्ध्यादिकांचें स्वरूप जो पृथक्कपणें जाणतो तो तत्त्ववित् [स: एव मुक्त: इति एवं वेदान्तेषु विनिश्चय: अस्ति-] व तोच मुक्त होय, अशाप्रकारें वेदान्तांत पूर्ण निश्चय केलेला आहे.

प्रकाश:- बुद्धि, आभास, आत्मा, जग इत्यादिकांचा निर्णय करणें हाच संसारनिवृत्तीचा उपाय आहे. याप्रमाणें उपाय सुचवून शिवाय अशाप्रकारें निर्णय करणाराची योग्यताहि सांगतात- अशा प्रकारें जो विवेक करितो तोच तत्त्ववेत्ता आणि मुक्त होय. हें आम्ही आधारावांचून सांगत आहों असें नाहीं, तर याला वेदान्तामध्यें म्हणजे उपनिषदें व शारीरक मीमांसा यांमध्यें ठिकठिकाणीं आधार आहे. ॥५४॥

-याप्रमाणें बंध व मोक्ष हे दोन्ही अविवेकामुळें होणारे आहेत असें ठरल्यावर, अद्वैतवादांत 'बद्ध व मुक्त कोण होतो ?' इत्यादि तर्कपटु लोकांकडून केल्या जाणाऱ्या कुतर्करूप थट्टेचें खंडन कसें करितां येतें तें श्रीहर्षमिश्रांच्या खंडनामध्यें पहावें व त्याप्रमाणें तार्किकांचें खंडन करावें; असें आतां सांगतात-

एवं च सति बंध: स्यात्कस्येत्यादिकुतर्कजा: ।
विडंबना दृढं खण्ड्या: खण्डनोक्तिप्रकारत: ॥५५

अन्वयार्थ - [एवं च सति 'कस्य बंध: स्यात्' इत्यादि कुतर्कजा: विडंबना: खंडनोक्तिप्रकारत: दृढं

खंड्या:-] असें असत्यामुळें 'बंध कोणाला होतो' इत्यादि प्रकारच्या तार्किकांडून होणाऱ्या कुतर्कमूलक विडंबना खंडनामध्यें सांगितल्याप्रमाणें पूर्णपणें खंडन करण्यास योग्य आहेत.

-याप्रमाणें श्रुति व युक्ति यांच्या योगानें कूटस्थाला बुद्ध्यादिकांहून पृथक् करून दाखवून पुराणांतहि त्याचा विवेक केला आहे, असें सांगतात -

वृत्ते: साक्षितया वृत्तिप्रागभावस्य च स्थित: ।
बुभुत्सायां तथाऽज्ञोऽस्मीत्याभासाज्ञानवस्तुन: ॥५६

अन्वयार्थ - [वृत्ते: वृत्तिप्रागभावस्य बुभुत्सायां च-] वृत्ति, वृत्त्युत्पत्तीच्या पूर्वींचा काल, मी कोण आहें अशी जाणण्याची इच्छा झाली असतां आणि [तथा अज्ञ: अस्मि इति आभासाज्ञानवस्तुन: साक्षितया स्थित: अस्ति-] त्याचप्रमाणें ती होण्यापूर्वीं 'मी अज्ञ आहें' अशा प्रकारें अनुभवास येणारी 'अज्ञान' संज्ञक वस्तु यांच्या साक्षित्वानें शिवच स्थित आहे.

प्रकाश:- **वृत्ते:**- अंत:करणाच्या कोणत्याहि वृत्तीचा; **वृत्तिप्राग०**- कोणताहि वृत्ति उत्पन्न होण्यापूर्वी तिचा जो अभाव असतो त्याचा, जिज्ञासा उत्पन्न झाली असतां तिचा व तिच्या पूर्वीं मी अज्ञ आहें अशाप्रकारें प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या अज्ञानाचा साक्षी (कूटस्थ) शिव आहे असा याचा भावार्थ समजावा. ॥५६॥

-शिवनामक कूटस्थाच स्वरूप सांगतात -

असत्यालंबनत्वेन सत्य: सर्वजडस्य तु ।
साधकत्वेन चिद्रूप: सदा प्रेमास्पदत्वत: ॥५७
आनंदरूप: सर्वार्थसाधकत्वेन हेतुना ।
सर्वसंबंधवत्त्वेन संपूर्ण: शिवसंज्ञित: ॥५८

अन्वयार्थ - [असौ शिवसंज्ञित: असत्यालंबनत्वेन सत्य:-] हा शिवसंज्ञक कूटस्थ मिथ्या जगाचें अधिष्ठान असल्यामुळें सत्य, [तु सर्व जडस्य साधकत्वेन चिद्रूप:-] सर्व जड सृष्टीचा प्रकाशक असल्यामुळें चिद्रूप, [सदा प्रेमास्पदत्वत: आनंदरूप:-] सर्वदा प्रेमाचा विषय असल्यामुळें आनंदरूप [सर्वार्थसाधकत्वेन हेतुना सर्वसंबंधवत्त्वेन च संपूर्ण: अस्ति इति उच्यते-] आणि सर्व विषयांचा प्रकाशक व सर्वांशीं संबंध ठेवणारा असल्यामुळें संपूर्ण आहे, असें सांगितलें जातें.

प्रकाश:- या सर्व प्रतिपादनाचा थोडक्यांत असा अभिप्राय आहे. छप्पन्नाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें हा वृत्ति, वृत्तींचा (पूर्वींचा) अभाव, जिज्ञासा इत्यादिकांचा साक्षी असल्यामुळें त्याच्याहून भिन्न आहे. कारण साक्षी साक्ष्य पदार्थाहून (म्ह० आपल्या विषयाहून) भिन्न असतो; असें आपण व्यवहारांतहि नित्य पाहतों. तसाच तो भ्रामक जगाचें अधिष्ठान असल्यामुळें सत्य आहे. कारण भ्रमाचें अधिष्ठान सत्य असतें. असा अबाधित अनुभव आहे. सर्व जड पदार्थांचा तो प्रकाशक असल्यामुळें चैतन्यरूप आहे. कारण सचेतन प्राण्यावांचून जड पदार्थांचा कोणत्याहि प्रकारचा व्यवहार होणें शक्य नसतें. हा अत्यंत प्रेमाचें स्थान असल्यामुळें आनंदरूप आहे. जो पदार्थ दु:खरूप असतो त्याच्या ठायीं कोणाहि विवेक्याचें प्रेम नसतें; आणि त्याचप्रमाणें सर्व विषयांचा प्रकाशक व त्यामुळें आकाशाप्रमाणें सर्वांशीं संबंध ठेवणारा असा हा शिव असल्यामुळें संपूर्णहि आहे. ॥५७ । ५८॥

-सारांश -

इति शैवपुराणेषु कूटस्थ: प्रविवेचित: ।
जीवेशत्वादिरहित: केवल: स्वप्रभ: शिव: ॥५९॥

अन्वयार्थ - [इति शैवपुराणेषु-] ह्याप्रमाणें शैव पुराणांमध्यें [जीवेशत्वादिरहित: केवल: स्वप्रभ: शिव: कूटस्थ: प्रविवेचित: अस्ति-] जीव, ईश्वर इत्यादि भावरहित, केवल व स्वयंप्रकाश शिवसंज्ञक कूटस्थ उत्तमप्रकारें भिन्न करून दाखविला आहे.

प्रकाश:- शिवाचें ज्यामध्यें मुख्यत: प्रतिपादन केलेलें आहे अशा स्कंद, वायु इत्यादि पुराणांमध्ये जीवभाव व ईश्वरभाव यांनीं रहित अशा कूटस्थाचें पूर्वोक्त प्रकारें स्पष्ट विवेचन केलेलें आहे. ॥५९॥

-'जीवादिभावरहित असेंच त्याचें प्रतिपादन कां केलें ?' उत्तर --

मायाभासेन जीवेशौ करोतीति श्रुतत्वत: ।
मायिकावेव जीवेशौ स्वच्छौ तौ काचकुंभवत्
॥६०

अन्वयार्थ - [माया आभासेन जीवेशौ करोति इति श्रुतत्वत:-] माया चैतन्याभासाच्या योगानें जीव व ईश्वर यांस करिते अशी श्रुति असल्यामुळें [जीवेशौ मायिकौ एव-] जीव व ईश्वर मायिकच आहेत. [किंतु काचकुंभवत् तौ स्वच्छौ-] पण कांचेच्या घागरीप्रमाणें ते स्वच्छ आहेत.

प्रकाश:- अनादि मूलमाया चैतन्याच्या आभासांच्या योगानें ईश्वर व जीव करिते व तीच स्वत: माया व अविद्या या नांवाची त्यांची उपाधि होते; अशी श्रुति आहे. त्यामुळें माया व अविद्या यांच्या अधीन असणारे जीव व ईश्वर मायिक आहेत; असें नि:संशय ठरतें. पण ते जर मायिक आहेत असें म्हटलें तर देहादिकांहून त्यांच्यामध्यें फरक कसा राहणार ? असा कोणी प्रश्न करील म्हणून म्हणतात कीं मातीची घागर व कांचेची घागर ह्या दोन्ही घागरी जरी पृथ्वीद्रव्याच्याच असल्या तरी त्यांतील कांचेची घागरच जशी स्वच्छ असते, त्याप्रमाणें जीवेश व देहादि पदार्थ हे जरी मायिक असले तरी त्यांतील जीव व ईश्वर यांच्या मध्येंच स्वच्छता असणें युक्त व शक्य आहे. ॥६०॥

-'अहोपण मातीचा घट व कांचेचा कुंभ यांच्या मूळ द्रव्यांतच वैलक्षण्य असल्यामुळें एक अस्वच्छ व दुसरा स्वच्छ असा जो भेद होतो, तो योग्यच आहे. पण जगत्, जीव व ईश्वर यांच्या भेदाला कारण होणारी ही माया एकरूप असल्यामुळें जगत् व जीवेश्वर यांमध्यें वैलक्षण्यहि संभवत नाहीं,' अशी आशंका घेऊन 'अन्नजन्य देह व मन यांमध्यें जसें वैलक्षण्य असतें तसेंच जगत् व जीवेश्वर यांमध्यें आहे,' असें सांगतात-

अन्नजन्यं मनो देहात्स्वच्छं यद्वत्तथैव तौ ।
मायिकावपि सर्वस्मादन्यस्मात्स्वच्छतां गतौ
॥६१

अन्वयार्थ - [यद्वत् अन्नजन्यं मन: देहात् स्वच्छं-] ज्याप्रमाणें अन्नापासून उत्पन्न होणारें मन देहाहून स्वच्छ असतें [तथा एव तौ मायिकौ अपि-] त्याचप्रमाणें ते जीवेश्वर मायिक असूनहि [अन्यस्मात् सर्वस्मात् स्वच्छतां गतौ-] दुसऱ्या सर्वांपेक्षां स्वच्छतेला प्राप्त झाले आहेत.

प्रकाश:- 'हे शिष्या, मन अन्नमय आहे' इत्यादि छांदोग्यांत वर्णन आहे व त्यावरून हें अन्नमय आहे असा निश्चय होतो. देहहि अन्नमय आहे हें तर सर्व प्रसिद्ध आहे. अर्थात् मन व देह या उभयतांचेही अन्न हें एकच कारण असतांना जसा त्यांच्यामध्यें स्वच्छता व अस्वच्छता यांच्या द्वारा फरक पडतो तसाच जीव व ईश्वर आणि जगत् यांच्यामध्येंहि फरक पडतो असें समजावें. ॥६१॥

-'त्यांना कांचेप्रमाणें स्वच्छत्व जरी असलें तरी चित्त्व कसें ?' उत्तर -

चिद्रूपत्वं च संभाव्यं चित्त्वेनैव प्रकाशनात् ।
सर्वकल्पनशक्ताया मायाया दुष्करं न हि ॥६२

अन्वयार्थ - [चित्त्वेन एव प्रकाशनात् चिद्रूपत्वं च संभाव्यं-] चैतन्यत्वानेंच प्रकाशमान होत असल्यामुळें त्यांची चिद्रूपता संभवनीय आहे. [हि सर्वकल्पनशक्ताया: मायाया: तत् दुष्करं न-] कारण सर्व कल्पना करण्यास समर्थ असलेल्या मायेला ती

दुष्कर नाहीं.

प्रकाश:- जीव व ईश्वर चैतन्यच आहेत असा अनुभव व अनुमान यांवरून निश्चत होत असल्यामुळें त्यांची चिद्रूपता शक्य आहे. व "हें कसें होतें ?" असा येथें प्रश्नहि योग्य होत नाहीं. कारण अघटित घटना करणाऱ्या मायेला अशक्य असें कांहींच नाहीं. ॥६२॥

-प्रस्तुत प्रकारच कैमुतिकन्यायानें सिद्ध करितात-

अस्मन्निद्राऽपि जीवेशौ चेतनौ स्वप्नगौ सृजेत् ।
महामाया सृजत्येतावित्याश्चर्यं किमत्र ते ॥६३

अन्वयार्थ - **[अस्मन्निद्रा अपि स्वप्नगौ चेतनौ जीवेशौ यदि सृजेत्-] आमची निद्राहि स्वप्नांतील चेतनरूप जीव व ईश्वर यांस जर उत्पन्न करिते [तर्हि एतौ महामाया सृजति इति अत्र ते किं आश्चर्यं-] तर खऱ्या जीवेश्वरांस महामाया उत्पन्न करिते, यांत तुला आश्चर्य तें काय वाटतें ?**

प्रकाश:- अरे आमची य:कश्चित् निद्राहि जर स्वाप्निक जीवादिकांस निर्माण करूं शकते, तर महाशक्तियुक्त माया हवें तें करील यांत काय आश्चर्य आहे ? अशा प्रकारें प्रश्न करून जी वाक्यरचना करितात त्यास कैमुतिकन्याय म्हणतात. ॥६३॥

-'अहोपण, ईश्वरालाहि जर मायिकत्व असेल तर तो जीवाप्रमाणें असर्वज्ञ वगैरे होईल' या शंकेचें उत्तर-

सर्वज्ञत्वादिकं चेशे कल्पयित्वा प्रदर्शयेत् ।
धर्मिणं कल्पयेद्याऽस्या: को भारो धर्मकल्पने ॥६४

अन्वयार्थ - [सर्वज्ञत्वादिकं च ईशे कल्पयित्वा प्रदर्शयेत्-] ही सर्वज्ञत्वादि भाव ईश्वराच्या ठिकाणीं कल्पून दाखविते. [या धर्मिणं कल्पयेत् अस्या: धर्मकल्पने क: भार: अस्ति-] जी धर्मीची कल्पना करिते तिला धर्माची कल्पना करणें काय कठिण आहे ?

प्रकाश:- सर्वज्ञत्वादि येथील आदिशब्दानें सर्वशक्तित्व, सर्वकर्मत्व इत्यादि श्रुतिप्रोक्त धर्म घ्यावेत. अहो धर्मी जो ईश्वर त्याचीहि जर ही महामाया सहज कल्पना करूं शकते, तर धर्मांची कल्पना करण्यांत तिला कोणता भार होणार आहे ! हाहि कैमुतिक न्याय होय. ॥६४॥

-'तर मग जीवेश्वरांप्रमाणें कूटस्थालाहि मायिकत्व आहे, असें म्हणावें लागेल ?' उत्तर -

कूटस्थेऽप्यतिशंका स्यादिति चेन्माऽतिशंक्यताम्
कूटस्थमायिकत्वे तु प्रमाणं नहि विद्यते ॥६५

अन्वयार्थ - **[कूटस्थे अपि अतिशंका स्यात् इति चेत्-] कूटस्थाविषयींहि मायिकत्वाची अतिशंका होईल, असें जर म्हणशील तर [मा अतिशंक्यतां-] तशी अतिशंका करूं नये. [हि कूटस्थमायिकत्वे तु प्रमाणं न विद्यते-] कारण कूटस्थ मायिक आहे अशाविषयीं कांहीं प्रमाण नाहीं.**

प्रकाश:- कूटस्थ मायिक आहे अशाविषयीं कांहीं प्रमाण नाहीं; म्हणजे जीव व ईश यांच्या मायिकत्वाविषयीं जसें श्रुतिप्रमाण आहे तसें याविषयीं नाहीं. व अनुमानादि दुसऱ्या योग्य प्रमाणांच्या योगानेंहि याची सिद्धि करतां येत नाहीं. यास्तव भलतीच कांहींतरी शंका घेऊं नये. ॥६५॥

-'कूटस्थाच्या सत्यत्वाविषयींहि कांहीं प्रमाण नाहीं' म्हणून म्हणाल तर सांगतों -

वस्तुत्वं घोषयन्त्यस्य वेदान्ता: सकला अपि ।
सपत्नरूपं वस्त्वन्यन्न सहन्तेऽत्र किंचन ॥६६

अन्वयार्थ - [सकला: अपि वेदान्ता: अस्य वस्तुत्वं घोषयन्ति-] सर्वहि वेदान्त-उपनिषदें याचें वस्तुत्व कंठरवानें सांगत आहेत [च अत्र सपत्नरूपं अन्यत् किंचन वस्तु न सहन्ते-] व कूटस्थाच्या परमार्थतेविषयीं प्रतिपक्षभूत अशी दुसरी कोणतीहि वस्तु ते सहन करीत नाहींत.

प्रकाश:- सर्व उपनिषदें हा कूटस्थ आत्मा

पारमार्थिक सत्य आहे; असा घोष करीत आहेत. व त्यांना त्यांच्या यथार्थत्वाविषयींच्या समर्थनास आड येणारें कांहींहि खपत नाहीं; असा याचा भावार्थ आहे ॥६६॥

-'अहोपण, कूटस्थाचें सत्यत्व व जीवेश्वरांचें मिथ्यात्व सिद्ध करतांना तुम्ही नुस्त्या श्रुतीचाच उल्लेख करितां; तर्कांनीं कांहींच सिद्ध करीत नाहीं !' उत्तर -

श्रुत्यर्थं विशदीकुर्मो न तर्काद्वच्मि किंचन ।
तेन तार्किकशंकानामत्र कोऽवसरो वद ॥६७

अन्वयार्थ - [वयं श्रुत्यर्थं विशदीकुर्मः-] आम्ही श्रुतीचा अर्थ स्पष्ट करितों. [तर्कात् किंचन वस्तु न वच्मि-] तर्काच्या योगानें कोणतीहि गोष्ट स्पष्ट करीत नाहीं. [तेन तार्किकशंकानां अत्र कः अवसरः वद-] तेव्हां तार्किकांच्या शंकांना येथें अवकाश कसा मिळणार ? सांग.

प्रकाशः- आस्तिक श्रद्धाळूंनीं कृतार्थ व्हावें म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहों. नास्तिकांशीं भांडत बसण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. यास्तव आम्हांस जें कांहीं सांगावयाचें आहे तें आम्ही श्रुतीचा अर्थ स्पष्ट करून सांगत आहों. तर्कांचा आम्हांस मुळींच आश्रय करावयाचा नाहीं. व जरी किंचित् कोठें तर्क केला तरी तो श्रुतीच्या अर्थाशीं मिळेल व त्यामुळे श्रुतीचा अर्थ दृढ होईल असें वाटल्यासच करतों. तेव्हां आमच्या या प्रतिपादनांत तार्किकांच्या तर्कांस कशी जागा मिळणार ? ॥६७॥

- ज्या अर्थीं असें आहे -

तस्मात्कुतर्कं संत्यज्य मुमुक्षुः श्रुतिमाश्रयेत् ।
श्रुतौ तु माया जीवेशौ करोतीति प्रदर्शितम् ॥६८

अन्वयार्थ - [तस्मात् मुमुक्षुः कुतर्कं संत्यज्य श्रुतिं आश्रयेत्-] म्हणून मुमुक्षूनें कुतर्क सोडून श्रुतीचा आश्रय करावा. [श्रुतौ तु माया जीवेशौ करोति इति प्रदर्शितम्-] श्रुतीमध्यें तर माया, जीव व ईश्वर यांस करिते असें सांगितलेलें आहे.

प्रकाश- श्रद्धाळूंनीं केवळ श्रुतीचा आश्रय करावा. श्रुतीमध्ये माया, जीव व ईश्वर यांस करिते असें स्पष्ट सांगितलेलें आहे. यास्तव प्रत्येक आस्तिक वैदिकानें त्या मताचाच अंगिकार करावा. उगीच भलभलते तर्क करीत बसूं नये. ॥६८॥

-मायेनें चैतन्याचे जीव ईश्वर असे प्रकार केले ते दाखवितात -

ईक्षणादिप्रवेशान्ता सृष्टिरीशकृता भवेत् ।
जाग्रदादिविमोक्षान्तः संसारो जीवकर्तृकः ॥६९

अन्वयार्थ - [ईक्षणादि-प्रवेशान्ता सृष्टिः ईशकृता भवेत्-] ईक्षणापासून प्रवेशापर्यंत सृष्टि ईश्वरानें केलेली आहे. [तथा जाग्रदादि-विमोक्षान्तः संसारः जीवकर्तृकः अस्ति-] त्याचप्रमाणें जाग्रदवस्थेपासून मुख्य मोक्षापर्यंत संसार जीवानें केलेला आहे.

प्रकाशः- हा श्लोक पूर्वीं सहाव्या व सातव्या प्रकरणांतहि गेला आहे. व त्याचें व्याख्यान मी यथामति केलें आहे. 'भिन्न भिन्न सृष्टीमुळें चैतन्याचे असे दोन प्रकार झाले आहेत. पण ते वस्तुतः मायिकच आहेत' हें दृढ करण्याकरितां पुनः हा श्लोक येथें घेतला आहे. ॥६९॥

-कूटस्थ असंग असल्यामुळें त्यांत कोणत्याहि प्रकारचा अतिशय येत नाहीं असें सांगतात -

असंग एव कूटस्थः सर्वदा नास्य कश्चन ।
भवत्यतिशयस्तेन मनस्येवं विचार्यताम् ॥७०

अन्वयार्थ - [कूटस्थः असंगः एव- कूटस्थ असंगच आहे अस्य कश्चन अतिशय न भवति] याच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा अतिशय न्यूनाधिक्य येत नाहीं [तेन मनसि सर्वदा एवं विचार्यताम्-]

यास्तव मुमुक्षूनें मनांत सर्वदा असा विचार करावा.

प्रकाश:- ह्या कूटस्थाच्या ठायीं तो असंग असल्यामुळें जन्मादि अतिशय होत नाहीं; असा याचा तात्पर्यार्थ आहे. ॥७०॥

-विचार कसा करावा तें सांगतात -

न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधक: ।
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥७१

अन्वयार्थ - [निरोध: न-] वस्तुत: नाश नाहीं, [च उत्पत्ति: न-] व उत्पत्ति नाहीं, [बद्ध: न-] कोणी बद्ध नाहीं [च साधक: न-] व साधक नाहीं. [मुमुक्षु:न-] कोणी मुमुक्षु नाहीं [मुक्त: वै न-] आणि मुक्त नाहीं. [इति एषा परमार्थता अस्ति-] अशी ही परमार्थता आहे.

प्रकाश:- ही श्रुति आहे. पण तिला श्रीगौडपादाचार्यांनीं मांडुक्योपनिषदावरील आपल्या कारिकेंत घेतली आहे. मायिक दृष्टि सोडून जर खरा खरा प्रकार काय आहे, म्हणून पाहूं लागलें तर तो असा भासतो. परमार्थदृष्ट्या ज्ञानी पुरुष ''न शास्ता न शास्त्रं न शिष्यो न शिक्षा न च त्वं न चाहं न चायं प्रपंच: । स्वरूपावबोधो विकल्पासहिष्णुस्तदेकोवशिष्ट: शिव: केवलोऽहं ।'' असें म्हणत असतो-असें आचार्यांनींहि एके ठिकाणीं सांगितलें आहे. ॥७१॥

-'तर मग श्रुतीनें ठिकठिकाणीं जीव, ईश्वर व जगत् यांच्या स्वरूपाचें प्रतिपादन का केलें ?' उत्तर-

अवाङ्मनसगम्यं तं श्रुतिर्बोधयितुं सदा ।
जीवमीशं जगद्वापि समाश्रित्य प्रबोधयेत् ॥७२

अन्वयार्थ - [श्रुति: सदा अवाङ्मनसगम्यं तं बोधयितुं-] श्रुति सर्वदा वाणी व मन यांस अगम्य अशा कूटस्थाचा बोध करण्यासाठीं [जीवं ईशं जगत् वा अपि समाश्रित्य प्रबोधयेत्-] जीव ईश्वर व जगत्हि यांचा पूर्णपणें आश्रय करून बोध करते.

प्रकाश:- केवळ मुमुक्षूंस कूटस्थाचें ज्ञान व्हावें म्हणून श्रुति प्रसंगोपात्त जीवादिकांचें वर्णन करिते. ॥७२॥

-'अहोपण, श्रुतीला एकरूप तत्त्वच जर सांगावयाचें आहे तर तिच्यामध्यें परस्पर विरोध का दिसतो ?' उत्तर-

यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्ति: प्रत्यगात्मनि ।
सा सैव प्रक्रियेह स्यात् साध्वीत्याचार्यभाषितम् ॥७३

अन्वयार्थ - [पुंसां प्रत्यगात्मनि यया यया व्युत्पत्ति: भवेत्-] पुरुषांना प्रत्यगात्म्याविषयीं ज्या ज्या प्रक्रियेच्या योगानें बोध होईल, [सा सा एव इह साध्वी प्रक्रिया स्यात्-] ती तीच येथें उत्तम प्रक्रिया होय, [इति आचार्यभाषितं अस्ति-] असें आचार्यांनीं सांगितलें आहे.

प्रकाश:- हें सुरेश्वराचार्यांचें वार्तिक आहे. यांत हेतूकडे दृष्टि देऊन तो ज्या युक्तीनें साध्य होईल तीच युक्ति योजावी असें सांगितलें आहे. सारांश ऐक्यरूप तत्त्वाचाच श्रुति बोध करिते हें जरी खरें आहे, तरी तिनें या वार्तिकांत सांगितल्याप्रमाणें अज्ञांकरितां अनेक उपाय योजिले आहेत. पण त्यावरून मुख्य तत्त्वामध्यें कांहीं भेद पडतो असें समजूं नये. ॥७३॥

-'श्रुतींचा मुख्य अर्थ जर एकच आहे तर त्याचें प्रतिपादन करणारांमध्यें एवढा मोठा मतभेद का दिसतो ?' उत्तर -

श्रुतितात्पर्यमखिलमबुद्ध्वा भ्राम्यते जड: ॥
विवेकी त्वखिलं बुद्ध्वा तिष्ठत्यानन्दवारिधौ ॥७४

अन्वयार्थ - [अखिलं श्रुतितात्पर्य अबुद्ध्वा जड: भ्राम्यते] सर्व श्रुतितात्पर्य न जाणून मूढ तत्त्वार्थाविषयीं भ्रांत होतो. [विवेकी तु अखिलं बुद्ध्वा आनंदवारिधौ तिष्ठति] पण विवेकी तें सर्व

जाणून आनंदसमुद्रांत निमग्न होऊन राहतो.

प्रकाश:- असंख्य श्रुतींची एकवाक्यता करणें हें कांहीं सोपें काम नव्हे. यास्तव सामान्य जन त्याविषयीं सर्वदा मोहित होतात. पण एकादाच जो विवेकी असतो तो श्रुतींचें तात्पर्य जाणून आनंदसमुद्रांत लोळत राहतो. सारांश विवेक हें सर्वसुखाचें आगर होय. ॥७४॥

प्रश्न:- पण श्रुतींची एकवाक्यता केल्यावर तरी विवेकी पुरुषाचा निश्चय कसा होतो ? उत्तर -

मायामेघो जगन्नीरं वर्षत्वेष यथा तथा ॥
चिदाकाशस्य नो हानिर्न वा लाभ इति स्थिति: ॥७५॥

अन्वयार्थ - [एष: मायामेघ: जगन्नीरं यथा तथा वर्षतु] हा मायारूपी मेघ जगद्रूपी उदकाचा कसाहि वर्षाव करो. [चिदाकाशस्य नो हानि: वा न लाभ: इति स्थिति भवति] त्यामुळें चिद्रूप आकाशाची कांहीं हानि नाहीं व लाभहि नाहीं अशी स्थिति होते.

प्रकाश:- ज्याला श्‍रुतींचें तात्पर्य समजून चुकलें आहे, त्यास जग इत्यादिकांविषयीं कांहींच वाटत नाहीं. तो आत्मवस्तूचे ठायीं निश्चल होऊन राहतो. प्रसिद्ध मेघांच्या केवढ्याहि जोराच्या वृष्टीनें सुद्धां जसा आकाशास कधीं विकार होत नाहीं, त्याप्रमाणें मायारूपी मेघ जगद्रूपी जलाचा कसाहि जरी वर्षाव करूं लागला तरी त्यापासून चिदात्म्याची कांहीं हानि किंवा लाभ होत नाहीं. ॥७५

-असो:-

इमं कूटस्थदीपं योऽनुसंधत्ते निरंतरम् ।
स्वयं कूटस्थरूपेण दीप्यतेऽसौ निरंतरम् ॥७६

अन्वयार्थ - [इमं कूटस्थदीपं य: निरंतरं अनुसंधत्ते-] या कूटस्थदीपाचें जो सतत चिंतन करितो [असौ स्वयं कूटस्थरूपेण निरंतरं दीप्यते] तो स्वत: कूटस्थरूपानें अखंडित प्रकाशमान होतो.

इति पञ्चदश्यां कूटस्थदीप: ॥

प्रकाश:- या श्लोकांत प्रस्तुत प्रकरणाच्या अभ्यासापासून मिळणाऱ्या फलाचा निर्देश केला आहे. ह्या प्रकरणांत 'खादित्यदीपिते०' हा उपक्रम: व 'माया मेऽद्य०' हा उपसंहार. 'आभासब्रह्मणी०' 'संधयो खिलवृत्तीनाम्०' इत्यादि ठिकाणीं कूटस्थाचा अभ्यास केलेला आहे. 'नाहं ब्रह्म विबुध्येत०' येथें कूटस्थाख्य शुद्धजीवाचें ब्रह्माशीं ऐक्य-चिदाभासाख्य विशिष्ट जीवाचा बाध करून सामानाधिकरण्य संभवतें-ही अपूर्वता दाखविली आहे. 'असंग एव कूटस्थ:' हें फल. 'आत्मा प्रवेशं संकल्प्य प्रविष्ट इति गीयते' हा अर्थवाद. 'द्विगुणीकृत चैतन्ये०' असें म्हणून उपपत्ति दाखविण्यांत आली आहे. या प्रकरणाच्या सहा तात्पर्यबोधक लिंगांवरून - निरुपाधिक त्वंप्रदार्थ जो कूटस्थ त्याच्या ज्ञानास प्रतिबंध करणाऱ्या प्रमेयगत असंभावनेची निवृत्ति होते-असेंच दृढ होतें. सारांश कूटस्थाचें सतत चिंतन केलें असतां चिंतकास अखंड ब्रह्मप्राप्ति होते. ॥७६॥